


# गमती देशोदेशींच्या

अनामिका बोरकर

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# गमती देशोदेशींच्या : १:

## तांबोपाटा, माबुला, वाइटोमो कंदरी

(प्रवासवर्णन)

लेखिका : अनामिका धनंजय बोरकर

# गमती देशोदेशींच्या : १: तांबोपाटा, माबुला, वाइटोमो कंदरी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# गमती देशोदेशींच्या : १: तांबोपाटा, माबुला, वाइटोमो कंदरी

लेखिका - अनामिका धनंजय बोरकर.
अ / १८,वूडलॅंड अपार्टमेंट,
गांधी भवन मार्ग,कोथरुड,पुणे ४११०२९.
दूरध्वनी:९८१९८६९०९०.
Mail: bodhamu@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : ६ ऑक्टोबर २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे कायद्याने आवश्यक आहे.

## अनामिका धनंजय बोरकर.



*सिंगापूरमध्ये असताना महाराष्ट्र मंडळाच्या बऱ्याच उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याची संधी मिळाली महाराष्ट्र दिनानिमित्त सादर केलेल्या महाराष्ट्राच्या स्टॉलचे आयोजन करताना खूप मोठमोठ्या भारतीय मान्यवरांची जवळून भेट घेता आली. *सिंगापूर सरकार ने आयोजित केलेल्या भारताच्या संस्कृतिक प्रदर्शनात महाराष्ट्राचे दिमाखदार पॅवेलियन, महाराष्ट्रातील वस्तूंची सिंगापूर मध्ये विक्री, सिंगापूरमधील मान्यवरांच्या त्यामुळे झालेल्या ओळखी अविस्मरणीयच!

* कॉलेज जीवनापासूनच नाटकाबद्दल खूप प्रेम. नाटकाच्या संदर्भात दिग्दर्शन करणे, नेपथ्य करणे  याची जास्त आवड. महाराष्ट्र मंडळाच्या नाटकांबरोबरच भारतातून तिथे सादर होणाऱ्या नाटकांसाठी नेपथ्य करताना खूप शिकता आले. खूपशा प्रथितयश नट नट्यांना जवळून बघता आले आणि बऱ्याच ठिकाणी त्यांना वाटाड्या म्हणून सिंगापूर दर्शनही घडवण्याचा योग आला.

* महाराष्ट्र व भारतासंबंधी वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी पुढाकार घेणे, त्यासाठी येणाऱ्या पाहुण्यांची यथोचित सरबराई करणे हाही एक छंदच.

* वाचन मनापासून आवडते.पण कोणतेही विषय विशिष्ट असे नाहीत. लेखक तर सगळेच प्रिय. कारण प्रत्येकामध्ये काहीतरी लिखाणाचे वेगळे कौशल्य लपलेले असते. त्यामुळे वेगवेगळ्या लेखकांची विविध विषयांवरची पुस्तके वाचणे ह्यातली गंमत काही वेगळीच. मला ती आवडते. तरीही त्यातल्या त्यात पुल आणि मंगला गोडबोले आवडते लेखक. ऐतिहासिक पुस्तके हा वीक पॉईंट म्हणता येईल .

* अजूनही आम्ही जाऊन आलेल्या जागेचे नुसते नाव काढले तरी तिथला परिसर , वातावरण सगळे अगदी काल बघितल्यासारखे स्वच्छ आठवते. त्या आधारावर प्रवासातल्या गमतीजमती लिहिणे चालूच आहे .”

# प्रस्तावना

"गमती देशोदेशींच्या" या पुस्तकमालिकेद्वारे मी माझे वेगवेगळ्या देशात आलेले अनुभव आणि दिसलेली विविधता आपल्यासमोर मांडणार आहे. प्रत्येक ठिकाणचा अनुभव वेगळा आहे, तो आपल्याला काहीतरी वेगळा आनंद देईल याची मला खात्री आहे.

खरेतर लग्न होईपर्यंत सांगली सारख्या छोट्या (त्या वेळच्या) गावात वाढलेली मी, जरी लग्नानंतर पुण्यात आले तरी प्रवास सांगली पुणे इतकाच. आणि हो, नागपूरचा २ वेळा. बस! पण नंतर माझ्या पायावरचे चक्र जसे काही गरागर फिरायलाच लागले. नोकरी निमित्त नवरा पुण्याहून  मुंबई,मुंबईहून सिंगापूर  असा फिरायला लागला आणि त्याच्या मागे सप्तपदी चालत मी...असे जवळपास ३० वर्षे तरी फिरत होतो. त्यापैकी  १८ वर्षेतर  आम्ही सिंगापूर मध्ये होतो. सिंगापूरला गेल्यावर जग खूप जवळ आले.

मुंबईतल्या एअर इंडियाच्या नोकरी मध्ये पहिल्यांदा अमेरिका वारी नंतर इंग्लंड, फ्रान्स, सिंगापूर असे जाण्याचा योग आला. पहिल्यांदा जेव्हा मी अमेरिका बघितली, तिथली भव्यता, स्वच्छ रस्ते, टोलेजंग उंच उंच इमारती, लाल गोरी गोबरी माणसं त्या सगळ्याचा माझ्यावर झालेला परिणाम अजूनही ताजा आहे. स्वतःच्या धाडसावर भिस्त

ठेवत सासूबाईंना  घेऊन केलेली  लंडनची वारी, दोन लहान मुलांना घेऊन केलेला पॅरिस  व त्यापुढे विमान बदलून केलेला प्रवास अजूनही स्पष्ट आठवतो. त्यावेळचे वर्णन लिहिताना आजही अंगावर काटा येतो.

सिंगापूरच्या  १८ वर्षांच्या वास्तव्यात तिथले सामाजिक,सांस्कृतिक जीवन खूप जवळून पाहता आले,तिथल्या महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमात सहभागी होता आले आणि मुख्य म्हणजे नवऱ्याच्या नोकरीमुळे त्यांच्याबरोबर बऱ्याच देशात राहता आले, बरेच काही बघता आले, शिकता आले. त्या सगळयाचा परिणाम म्हणजे या पुस्तकातील लेख.

या व्यतिरिक्त दरवर्षी कुठे ना कुठेतरी पर्यटनाला जाण्याची इच्छा आणि हौस निर्माण झाली.त्यातून केलेले हे निरीक्षण. जरी प्रवासी कंपनीची सहल घेतली तरी त्यात नेहमीच्या ठिकाणाबरोबरच काहीतरी वेगळं बघायला मिळायला हवे ही ओढ निर्माण झाली .त्या तऱ्हेने प्रवासी कंपनीची शोधाशोध करणे,त्या ठिकाणची माहिती गोळा करणे व तिथे गेल्यावर सजगतेने निरीक्षण नोंदवणे या सगळयातून खूप काही शिकता आले आणि तेच या पुस्तकरूपाने तुमच्यासमोर आले.

या सगळया लेखन प्रवासाची सुरुवात वाचनातून झाली. बरीच प्रवास वर्णने सिंगापूरला वाचायला मिळाली. पुल देशपांडे यांचां माणसे वाचण्याचा दृष्टिकोन, विविध खाद्यपदार्थांचे वर्णन बरेच काही शिकवून गेले, मीना प्रभूंच्या

पुस्तकामुळे त्या त्या ठिकाणचा इतिहास  भूगोल याचा अभ्यास कसा करावा ते कळाले. अशी  इतर बरीच प्रवासवर्णने ज्ञानात भर घालत होती. डोक्यात आम्ही पाहिलेले सगळे साठवलेले होते पण ते सगळे माझे माझ्यापुरते रहात होते.

माझा नवरा सारखा “तुला एवढ सगळ आठवत आहे तर तू ते लिहून काढ ना “ म्हणुन मागे लागला होता.पण मला काही ती उर्मी होत नव्हती. शेवटी अचानक मेनका मासिकातली “पर्यटन विशेषांका”मधली ‘लेख लिहा’ अशी जाहिरात वाचनात आली आणि  मला लिहावेसे वाटू लागले. ‘ उरोस” वरचा लेख तयार झाला आणि चक्क छापूनही आला. नंतर ख्रिसमस आला आणि ‘सांताक्लॉजची भेट’ सकाळच्या साप्ताहिकात झळकली. माझ्या मित्र मैत्रिणींना मी ते दोन्ही लेख उत्साहात पाठवले आणि त्यांनीही त्यांचे भरभरून कौतुक केले. माझा उत्साह वाढला, लिखाण चालू झाले आणि बघताबघता लेखांनी पंचविशी कधी पार केली कळलेच नाही .मग त्यातीलच  काही लेख पुस्तकरूपाने तुमच्या समोर आणले आहेत.प्रत्येक लेखात तुम्हाला काहीतरी वेगळे वर्णन वाचायला मिळावे याची मी काळजी घेतली आहेच.तरीही तुमच्या पाहण्यात तसेच दृश्य इतरत्रही आले असेल तर तुम्हाला  वाचताना नक्कीच ते पुन्हा अनुभवायला मिळेल.

११००० फूट उंचीवरील समुद्राचा भास होईल असा प्रचंड विस्तार असणारे टिटीकाका हे  तळे  व त्यातील वाऱ्यावर हेलकावे घेणारी ,तरंगणारी ‘उरोसची खेडी’ बघायला जायला हवं , असं का वाटलं ते आजही सांगता येणार नाही.पण अफलातून अस वेगळं काहीतरी पाहायला मिळालं हे खरं.पेरू या देशात अशी बरीच ठिकाणं आहेत की जी सहसा बघितली जात नाहीत अमेझॉन नदीच्या उप नद्या पैकी सर्वात मोठ्या नदीच्या जंगलात केलेलं वास्तव्य, १०० फूट उंचीवरून दोरीच्या पुलावरून फिरण्याचे केलेले साहस,वेगवेगळे प्राणी,वनस्पतींची वैशिष्ट्ये,सगळेच दुसऱ्या जगात बघितल्या सारखे वाटले. लहानपणी शिकलेल्या नास्काच्या जमिनीवरच्या रेषा,त्यामुळे तयार झालेले महाकाय प्राण्यांचे आकार विमानातून बघणे हा तर खूपच थरारक अनुभव.माझ्या लेखातून तुम्हाला त्याची थोडी जरी कल्पना आली तरी सगळा प्रपंच कारणी आल्यासारखे मला वाटेल.

जपानचा प्रसिद्ध ‘चेरी ब्लॉसम उर्फ साकुरा’ चा  अनुभव अगदी बागेच्या मधोमध मुक्काम करून घ्यायला मिळाला.कळ्यांपासून ते पाकळ्यांपर्यंतची नाजुकशा फुलांची सर्व जीवन यात्रा जवळून पहाण्यातला आनंद अवर्णनीयच. दुबई सारख्या रखरखीत वाळवंटातील बागा पाहून अक्षरशः तोंडे बोटात जातात.चिनी कलेची विविधता तिबेट ते चीन या अंतरात जागोजागी बघायला मिळाली.पण चिनी कलाकारांनी क्षणार्धात आपल्यासमोर बदललेला  रंगीत  मुखवटा थक्क करून टाकतो. एरवी क्षुल्लक दिसणाऱ्या काजव्यांची किमया अंधाऱ्या गुहेत

त्यांचे महत्त्व मनावर ठसवते.व्यापाराची आगळीवेगळी तऱ्हा इजिप्तमध्ये बघितल्यावर नाईलच्या त्या व्यापारीवर्गाचे कौतुक करावेसे वाटले तर त्यात काही नवल नाही. सिंगापूर बद्दल जितके लिहावे तेवढे थोडेच. त्यांच्या चालीरिती, सणवार सगळे अगदी जवळून बघायला मिळाले. तिथल्या काही आठवणी तुमच्याबरोबर वाचताना मलाही खूप आनंद होईल. असे हे वेगवेगळ्या देशात नेणारे लेख तुम्हाला आवडतील अशी आशा वाटते. बस. मी माझे काम केले.

आवडले तुम्हाला... तर नक्की कळवा आम्हाला...

**अनामिका धनंजय बोरकर**

**98 198 690 90**


## तांबोपाटा- जंगलातला निवास

दक्षिण अमेरिका पहावी असे खूप दिवसांपासून मनातले स्वप्न होते. पण एक तर तो भाग सिंगापूरहून खूप लांब त्यामुळे अर्थातच प्रवासाला लागणरा वेळ व खर्चही खूप. त्यामुळे जाणे जरासे काय पुष्कळच लांबणीवर पडत होते. त्यात दक्षिण अमेरिका बऱ्याच देशांचा बनलेला भूभाग. त्यामुळे सगळे भाग जरी नाही तरी महत्वाचे देश बघायला दिवसही जास्त लागणार होते. त्यामुळे सिंगापूर हून परतल्यावर मनाने उचल खाल्ली. ॲमेझॉन, नास्काच्या रेषा, इग्वासू धबधबा, माचूपिचू असे बरेच काही पहायचे आमच्या मनात होते. आम्हाला तिथले बरेच काही, उत्तम सीझनमध्ये, कमीतकमी दिवसात पहायचे होते.

ते सगळे सामावणारी टूर कंपनी मिळणे दुरापास्तच होते. त्यामुळे आम्ही ॲमेझोन नदीच्या ऐवजी तिच्या उपनदीवरच समाधान मानायचे ठरवले. मनात थोडीशी नाराजी घेऊनच ‘अनुभव हॉलीडेज’ बरोबर आम्ही दक्षिण अमेरिकेला निघालो. आमची नाराजी पाहून संचालक मयुरेश भट नुसते स्मित करत होते. कुठलेही स्पष्टीकरण देण्याच्या फंदात ते तेव्हा अजिबात पडले नाहीत. कारण आम्हाला जे विलक्षण अनुभव ॲमेझोन न पहाताही तिथे मिळणार होते त्याची त्यांना पूर्ण कल्पना होती. इग्वासू धबधबा सोडला तर बाकीची बरीच ठिकाणे पेरू या देशात होती त्यामुळे आम्हाला जास्तीतजास्त दिवस पेरूमध्ये घालवायचे होते. अर्जेंटिना, चिले पाहून आम्ही पेरूची राजधानी लीमाला गेलो.


यावेळी आम्ही लीमात एकच रात्र राहून पुढे एमेझोनच्या मुख्य उपनदीच्या जंगलात जाण्यासाठी पुअर्तो माल्डोनाडोला जाणार होतो. लीमाहून विमानाने कुझ्को मार्गे पुअर्तो माल्डोनाडो या गावापर्यंत आमचा प्रवास होता. रात्रभराचा लीमाचा मुक्काम आटोपून आम्ही पुअर्तो माल्डोनाडोला निघालो. विमानोड्डाणानंतर लगेचच लीमा संपून खालचे डोंगर दिसायला लागले. लांबच लांब पसरलेले डोंगर व क्वचित दिसणारी छोटी गावे सोडली तर कुझ्को पर्यंत तरी पहाण्यासारखे खास काही नव्हते. कुझ्को मात्र विमानातून अगदी साधेसुधे, कौलारू घरे असणारे वाटले. इथे विमान १ तास थांबणार होते पण विमानातून खाली उतरायचे नव्हते, त्यामुळे विमानात बसल्या बसल्याच जमेल तेवढे नजरेत साठवायला सुरूवात केली. घरं तर इतकी जवळ की, परत उड्डाण करताना विमानाचा पंख अगदी भिंतीबाहेरच्या घरांना लागेल अशी भीती वाटावी. घरे होती दुमजली, पण सगळी बाहेरच्या भिंती बिनगिलाव्याची, विटा दाखवणारी. म्युनिसीपालटीचे कर कमी बसावेत म्हणून ही युक्ती असल्याचे कळले.

घरांच्या गच्चीवरून लहानमुले चक्क पतंग उडवत होती. विमान टॅक्सीवेवर चालू लागल्यावर ती पतंग उडवणे सोडून आम्हाला टाटा करायल लागली. कुझ्को सोडल्यावर आमचे विमान परत डोंगरदऱ्यांवरून उडू लागले.







हळूहळू खाली दिसणाऱ्या परिसरात हिरवागार गालिचा दिसायला लागला. बघता बघता त्याचा पसारा वाढत गेला व नजर जाईल तिथपर्यंत हिरवेगार जंगल पसरलेले दिसू लागले. गच्च भरलेले ब्रोकोलीचे गड्डे एका टोपलीत, अगदी जवळजवळ, गर्दी करून, कोंबून बसवावेत तसे घनदाट जंगल खाली दिसू लागले. जमिनीचा तर कुठे मागमूसही दिसेना. हेच ते सुप्रसिद्ध ॲमेझोनच जंगल असावं असा विचार मनात यायला लागला तोच "आपण आत्ता ॲमेझोनची मुख्य उपनदी माद्रे दी ऑस वरून उडत आहोत व खाली जे जंगल दिसतय ते ॲमेझोनच्या खोऱ्यातील जंगलाचा एक भाग आहे" अशी माहिती ऐकू आली.

पहाता पहाता विमान जंगल पार करू लागलं व खाली कोकोच्या रंगाची अगदी एकाद्या दोरखंडासारखी लांबलचक रेघ जंगलाचे दोन भाग करताना दिसू लागली. “माद्रे दी दिऑस नदी खालून वहाते आहे ती बघा’’ अशी माहिती पायलटने लगेचच सांगायला सुरुवात केली. या नदीचा विस्तार, तिची पाणी वहाण्याची क्षमता, तिची खोली वगैरे वगैरे बरेच काही कानावर पडत होते. पण माझ्या डोक्यात काही फारसे शिरत नव्हते. वरून दिसणारे घनदाट जंगल व त्यात आपण तीन दिवस रहाणार... तर आपले कसे होणार या विचारनेच मला सध्यातरी हैराण केले होते.

विमान हळूहळू पुअर्तो माल्डोनाडोकडे झेपावत होतं. माद्रे दि दिऑसला आता तांबोपाटा नदीही येऊन मिळाली व तिचा विस्तार वाढला. चॉकलेटी रंगाचं पाणी खळखळ करत घनदाट जंगल कापत वहाताना दिसत होतं. बघताबघता विमान जमिनीवर उतरलं. धुळीनं भरलेली छोटीछोटी घरं असलेल माल्डोनाडो गाव फारसं आकर्षक दिसलं नाही. आपल्याकडच्या एकाद्या छोट्याश्या खेडेगावासारखं साधसुध गाव. विमानतळाबाहेर एक १५-१६ सीटर बस आमची वाट पहात होती.



बसमध्ये बसताना एक गंमत झाली. आमच्या ‘अनुभव’च्या ग्रुप बरोबर आणखीही एक ५-६ जणांचा युरोपियन ग्रुप होता. विमानातून उतरल्यावर बसमध्ये चढताना नेहमीप्रमाणे सगळे पुरूष मागे होते व आम्ही बायका पुढे होतो. बस खूप उंच होती. त्यामुळे स्टुल व आम्हाला हाताचा आधार देणारा (किंवा आमचे वजनदार गाठोडे बसमध्ये यशस्वीपणे ढकलू शकणारा) स्थानिक गाईड जसा रिकामा होईल तसतश्या एकेकजणी बसमधे चढत होतो व आपल्याबरोबर नवऱ्या साठीही जागा पकडत होतो. मी सगळ्यात पुढच्या बाकाकडे गेले व खिडकी पकडली. माझ्यामागे एक युरोपियन ग्रुपमधली बाई चढली. ती माझ्या बाकाजवळ येताच मी निमूट सरकून तिला जागा दिली तर ती आपली भांडायलाच लागली की. तशी ती इंग्लिशच बोलत असावी अशी अंधुक शंका येत होती खरं.. पण तिचे काय म्हणणे होते ते मला काही केल्या कळेना. शेवटी मला इंग्रजी कळतच नसावं या निर्णयाप्रत ती आली आणि तिने खुणांची भाषा सुरू केली. सिंगापूरमध्ये बरीच वर्षे राहिल्याने ती मात्र मला ताबडतोब कळाली. तिने म्हणे मी बसलेल्या जागेवर खालूनच तिचा रूमाल टाकला होता...

जागा धरायला म्हणून. (मागच्या जन्मी ती नक्की भारतात जन्मली असावी). मी तर रूमाल कुठेच पाहिला नव्हता. ती रूमाल शोधू लागली तर कुठे सापडेना. मी पण जागेवर घट्ट बसून एव्हाना माझा मराठी बाणा दाखवायला लागले होते. तिच्या खाणाखुणा ज्यास्त भराभर व ठळक होऊ लागल्या. ह्या गोंधळात ‘ मूळ शोधशोध नक्की कशाची? ’ याचाच संभ्रम उरलेल्या मंडळींच्या मनात निर्माण झाला. शेवटी बसच्या शेजारी उभे असलेल्या मुलाच्या लक्षात काहीतरी आले व वाऱ्याच्या झोताबरोबर बसखाली गेलेला धूळभरला रूमाल त्याने खाली वाकून त्या बाईकडे दिला. झाले... त्या धुळीने तिला इतक्या शिंका आल्या व खोकला यायला लागला की काही विचारू नका. तिच्याकडच्या सॉफ्ट ड्रिंकने तिचा खोकला काही केल्या थांबेना. शेवटी माझ्याकडच्या पाण्याने किमया केली, बाईंचा खोकला व राग एकदमच शांत झाला. नंतर प्रवासभर तिचे “सॉली... सॉली... ” चालू होते. या गोंधळात आमची बस कधी सुटली, मुक्कामाला कधी पोहोचली काही कळले नाही.

आम्ही बसमधून आमचा पुढचा मुक्काम जंगलातील ज्या ‘ इंकाटेरा हॉटेल ’ मध्ये होता त्याच्या रजिस्ट्रेशन ऑफीसकडे तांबोपाटा गावाकडे निघालो. तांबोपाटा गाव तसं लहानसंच, बरेचसे रस्ते माती धुळीने माखलेले, मध्येच चहाच्या छोट्याछोट्या टपऱ्या, कुठे वाणसामानाची किरकोळ दुकाने, वाटेत रस्त्यावरून धावणारी मुले, बैठी कौलारू घरे, त्याच्या दारात बायकापुरूष गप्पा मारताहेत... सगळ अगदी परिचित वाटत होतं. क्षणभर भारतातूनच प्रवास करतोय की काय असा भास होत होता. पण दुकानांवरच्या अगम्य भाषेतल्या पाट्या आम्हाला पेरूमध्ये असण्याची जाणीव करून देत होत्या. गावातले लोक अगदी कुतूहलाने आमच्या बसकडे बघत होते.

लीमा सोडतानाच आम्हाला आमचे गाईड मयुरेश भट यांनी फक्त तीन दिवसांसाठी लागणारं आवश्यक तेवढच सामान वेगळं पॅक करायची सूचना दिली होती. त्याप्रमाणे सगळी तयारी आम्ही केली होती. बाकीचे सगळे सामानही आमच्याबरोबरच होते तर हे वेगळे पॅकिंग का? याचे उत्तर थोड्याच वेळात मिळाले.

ऑफिसमध्ये पोहोचताच थंडगार टॉवेल व सरबत देऊन आमचे स्वागत झाले. आता सूर्य अगदी माथ्यावर आला असल्याने खूपच गरम होत होते. घामाने अंग अगदी चिंब भिजले. टॉवेलने खूपच बरे वाटले. तिथे आमच्याकडून आम्ही कुठले, कशासाठी तिथे आलोत, किती दिवस रहाणार, कुठे रहाणार, इथे आमचे काही बरेवाईट झाले तर तसे कळवायला आमच्या कुटुंबियांचे फोन नं. पत्ते, इ मेल आय डी वगैरे बरेचसे काहीबाही लिहून घेतले. इतरांचे माहीत नाही पण या शेवटच्या कॉलममुळे मी मात्र गंभीर झाले. सगळ्यांचे फॉर्म भरून झाल्यावर व पासपोर्टच्या त्यांना हव्या तितक्या प्रती काढून झाल्यावर आम्ही आता फक्त ३ दिवसांचे सामान घेऊन व उरलेले कम्युनिटी सेंटर मध्येच ठेऊन “ट्रॅव्हल लाईट” करत पुन्हा त्याच बसमध्ये बसलो व माद्रे दी दिऑस नदीच्या किनाऱ्याकडे निघालो. माद्रे दि दिऑस ही नदी समोर वहात होती. आता ती बरीच रुंद दिसत होती. जरी नदीत भरपूर पाणी होते तरी नदीचे पात्र रस्त्यापासून खूपच म्हणजे निदान वीस फूट तरी खाली होते.



नदी किनारा साधारणपणे रस्त्यापासून फर्लांगभर दूर होता व त्यापुढे आम्हाला बराच खडा उतार उतरून नदीत उभ्या असणाऱ्या छोट्या होडीत बसायचे होते. हे सगळे पाहून तिथूनच माघारी वळावे असे वाटायला लागले. पण हा विचार अंमलात आणायला फार उशीर झाला होता. पुढे जाण्याशिवाय काही दुसरा पर्याय नव्हता. नदीच्या पात्रात एक १०-१२ माणसे मावतील एवढी मोटरबोट उभी होती. बोट बऱ्या अवस्थेतली दिसत होती. २-३ सहाय्यकही दिसत होते. नदीचे चॉकलेटी रंगाचे संथ वहाणरे पाणी खुणावत होते. माझ्या मनाची तयारी हळूहळु होत होती.

पण निरखून बघितले तरी नदीपर्यंत जायला पक्क्या पायऱ्या कुठे दिसेनात. फक्त उतारावर मध्ये मध्ये लाकडी ओबडधोबड ओंडके मातीत रूतवलेले दिसत होते.  तेवढ्यात आमचे गाईड भटसाहेब अगदी मस्त कॉंक्रीटच्या जिन्यावरून उतरावे तसे त्या ओंडक्यांवर पाय ठेऊन उतरले व आम्हाला उतरायला प्रोत्साहित करु लागले. आम्ही जरी कसेतरी धाडस करून जायचे ठरवले तरी सामानाचे काय? ते कसे नेणार? ओरडून आम्ही त्याबद्दल काही विचारणार तोच कुठुनतरी काही माणसे अवतरली व आमच्याशेजारी उभ्या असणाऱ्या आमच्या बॅगा पाठीवर टाकून त्या निसरड्या ओंडक्यांवरून खाली उतरून बोटीत शिरलीसुद्धा. आमच्या बॅगांचा त्यांच्या आरामदायी प्रवासाबद्दल इतका हेवा वाटला म्हणून सांगू! कसेबसे सगळा धीर एकवटून मी पुढे गेले व लटपटत ओंडक्यांवर पाय ठेऊन बोटीत बसणार तोच बोट दूर सरकली. पण मघाशी खाली अदृश्य झालेल्या माणसांनी मला सावरून नीट बोटीत बसवले. '' हुश्श'' करून मी आता नदीची मजा अनुभवू लागले.

आमचा बोटीचा प्रवास ५०-५५ मिनिटांचा होता. आम्ही ज्या किनाऱ्यावरून बोटीत बसलो तो किनारा हळूहळू दूर जायला लागला. बोट नदी प्रवाहाच्या मधोमध आली तरी दुसऱ्या किनाऱ्यावर झोपड्या, हॉटेलसदृश काहीसुद्धा दिसेना. आमची बोट हेलकावे खात होती, पुढेपुढे जात होती, आता दोन्ही किनारे दिसेनात. नदीच्या विस्ताराची आता कुठे खरी कल्पना आली. थोड्याच वेळात दुसरीकडे दूरवर झाडे झुडपे दिसू लागली, वहात्या पाण्याबरोबर होडी त्यांच्याजवळ पोहोचली व किनाऱ्याला – किनारा कसला, पहिल्यासारखाच खडा चढ होता तिथे-पोहोचली. परत आमची तशाच लाकडी ओंडक्यावर पाय ठेऊन वर चढायची खटपट चालू झाली. १०-१५ पायऱ्याच होत्या पण ५०० पायऱ्या चढल्यासारखी दमछाक झाली. वर गेल्यावर दिसले की उंच वाढलेल्या झाडांमागे एकमजली, कौलारू घर आहे. आमच्या जिवात जीव आला. तिथपर्यंत जायला फक्त एक चिखलात व पाण्यात बुडालेली पायवाट होती. पाय ठेवायला मोठमोठ्या झाडाच्या बुंध्यांचे कापलेले तुकडे होते. चालताना ते डुगडुग करायचे, पाय घसरायचा व तोल सावरताना आमची तारांबळ व्हायची. सुखाची गोष्ट एकच होती की आमची फजिती पहायला तिथे

आमच्याशिवाय कोणीही नव्हतं! कसेबसे आम्ही पुढे एका मोठ्या झोपडीवजा खोलीत गेलो. हे आमच्या तिथल्या मुक्कामाचे इन्काटेरा हॉटेलचे ऑफीस कम रिसेप्शन सेंटर.

आम्हाला तिथे बसवून पुन्हा पासपोर्टच्या कॉपीज काढून घेणं, तिथल्या आमच्या मुक्कामात काय काय सोई (२४ तास दिवे नसणं, टीव्ही, फोन, इंटरनेट नसणं, वगैरे) असतील याची व आमच्या काय ॲक्टीव्हीटीज तिथे असतील याची कल्पना देणं झाल्यावर आम्हाला त्या हॉटेलच्या नकाशाची प्रत दिली व खोली नं. सांगितला पण किल्ली कुठे दिली होती? आमचा गोंधळ दूर करण्यासाठी ना तिथे अनुभवचे गाईड होते ना हॉटेलचे! सगळे त्या ऑफिसच्या मागे असणाऱ्या रेस्टॉरंटमध्ये अदृश्य झाले होते. शेवटी नकाशाप्रमाणे आम्ही खोल्या शोधायला निघालो. ऑफीसच्या मागे परत तसाच छोटा रस्ता होता. तो आम्हाला जेवणघर कम विश्रांती गृहाकडे घेऊन गेला. तिथे पोहोचल्या पोहोचल्या आम्हाला टॉवेल व चहा मिळाला. तिथल्या कर्मचाऱ्यांपैकी पुष्कळ जणांना इंग्रजी येत नव्हते. रेस्टॉरंटच्या मागे चांगला लाकडी कॉरीडॉर होता. तो साधारणपणे २ फर्लांग तरी लांबीचा असावा व त्यापुढे दोन्ही बाजूंना जमिनीपासून ३-४ फूट उंचावर छोट्या छोट्या लाकडी खोल्या होत्या. मध्ये लाकडी ओंडके जमिनीत रूतवलेली पायवाट व

ठराविक अंतरावर ४-४ खोल्यांचा समूह, अशा साधारण ३५-३६ खोल्या तरी असाव्यात. कॉरिडॉरच्या आजुबाजूला मस्त फुलझाडांचे ताटवे होते. वेगवेगळ्या रंगातली जास्वंदाची फुले पहाताना आत्तापर्यंतच्या प्रवासाचा सगळा शीण दूर झाला. कॉरिडॉरच्या शेवटी अचानकच एक ओळखीचा सुगंध नाकात शिरला. तो होता सोनटक्क्याचा. फुललेली टपोरी पांढरीशुभ्र सोनटक्क्याची फुलं मस्त वाऱ्यावर डुलत होती. नुकताच पाऊस पडून गेला होता, झाडांची पाने स्वच्छ, हिरवीगार, तजेलदार दिसत होती. एकूण हवेतला उकाडा सोडला तर वातावरण मोठे रम्य होते. सगळे पहात आम्ही आमच्या खोलीपाशी पोहोचलो. आमचीही खोली जमिनीपासून ३-४ फूट उंचीच्या लाकडी ओंडक्यांवर उभी होती. खोली संपूर्ण लाकडी जमीन व छत असलेली, आधारापुरते लाकडी खांब, डासांना अटकाव व्हावा यासाठी बारीक लोखंडी जाळी लावलेली होती. फक्त टॉयलेट सोडले तर, भिंती हा प्रकार कुठल्याच खोलीला नव्हता. त्यामुळे लांबूनही खोल्यांच्या आतले सगळे अगदी स्पष्ट दिसत होते. खोली बघताच कपडे कुठे बदलायचे, झोपायचे कसे वगैरे असंख्य प्रश्न डोक्यात गर्दी करू लागले. आमची २८ नं. ची खोली सगळ्यात शेवटी होती. त्याच्या पुढे सेवकांची रहाण्याची ठिकाणे व त्यामागे जंगल. आमच्या खोलीच्या शेजारच्या खोलीपलीकडे

माद्रे दी दिऑस नदी वहात होती. मोटरबोटीच्या आवाजात दबलेला तिचा आवाज आता शांत वातावरणात चांगला स्पष्ट ऐकू येऊ लागला. आमच्या खोलीजवळ एक भलेमोठ्ठे नीर फणसाचे झाड होते. त्यावर एक विड्याच्या पानांसारख्या दिसणाऱ्या पानांची वेल चिकटली होती. तिचे अगदी बारीक देठ झाडात इतके घट्ट रूतले होते की झाडावर फक्त पानेच चिकटलीत की काय अशी शंका येत होती. खोलीत जायला ४ लाकडी पायऱ्या होत्या. किल्लीशिवाय दार कसे उघडायचे या विचारातच पायऱ्या चढायला सुरूवात केली व नुसत्या लोटलेल्या दाराने आम्हाला खोलीत प्रवेश दिला.

खोली बाहेरची सज्जारूपी बैठकीची जागा, त्यात मस्त दोन झुले-हॅमॉक टांगलेले व आतली पलंगाची जागा व त्याच्याही आत टॉयलेट व आरसा, बेसीन वगैरेची जागा अशी बाहेरून लहान दिसली तरी दोन माणसांना पुरेशी प्रशस्त होती. बॅगा ठेवायला कोपऱ्यात दोन फडताळेही होती. शिवाय दोन बॅटऱ्या, दोन पाण्याच्या ॲल्युमिनियमच्या बाटल्या, डासांना पळवून लावण्यासाठी रिपेलंटच्या दोन बाटल्या, साबण शांपू असे सामानही होते. आणखी हो! कुठल्याच हॉटेलात न दिसलेली आपल्याकडच्या खेड्यातूनही हळूहळू गायब होऊ लागलेली एक वस्तूही होती. ती म्हणजे कंदील. ४ कंदील कशासाठी याचे उत्तर मिळायला मात्र

रात्र पडावी लागली. छपरी पलांगावर तेंव्हा तरी मच्छरदाणी गुंडाळून ठेवलेली होती. एवढ्या सगळ्या सोई होत्या पण कुलुप किल्ली मात्र नव्हती. इतकच काय दारांना कडीही नव्हती. मुख्य दाराला तर नाहीच पण टॉयलेटलाही आतून कडी नाही. सगळ्या खोल्या तर दोन दोन माणसांसाठीच्या... थोडीतरी प्रायव्हसी नको का?पण त्यासाठी टॉयलेटच्या दाराला बाहेर दोरीला बांधलेला एक लाकडी तुकडा लोंबकाळत होता. तो दारावर वाजवायचा की झालं! आणि तुम्ही आत असताना काही अनपेक्षित अडचण आली तर आत दाराला एक शिटी लोंबत होती. ती वाजवली की ताबडतोब तुम्हाला आवश्यक ती मदत मिळेल म्हणे. केल्याने देशाटन... काय काय माहिती मिळते... दिवे सकाळी फक्त २ तास व संध्याकाळी ३ तास. रात्री कधीतरी पंखाही चालू व्हायचा. पण त्याचा भरोसा नाही. त्यामुळे अर्थातच दूरदर्शन वा दूरध्वनी नाहीच. एकूण जंगलातच वास्तव्य ना! आम्ही जरा फ्रेश होत होतो तोवर दुपारच्या जेवणाची शिट्टी वाजली आणि आम्हाला भुकेची जाणीव झाली.

रेस्टॉरंट ५० प्रवाशांची सोय करू शकेल इतक मोठं होतं. मेनुकार्ड या वस्तूला सध्यातरी आमच्या जगात 'एक अगम्य भाषेतल पुस्तक' इतकाच अर्थ होता. काही कळत नसूनही गंमत म्हणून आम्ही दरवेळी ते हाताळत होतो. आमचे गाईड आम्ही कुठल्याही रेस्टॉरंटमध्ये शिरलो की सरळ किचन मध्ये अदृश्य होत व थोड्याच वेळात भरपूर भाज्या घातलेले बऱ्यापैकी मसालेदार, टॉमॅटो कांद्यांच्या चकत्यांनी सजवलेले दिसायला खूप वेगळे असणारे पदार्थ समोर येत. आताही वेगवेगळया ५-६ तरी डिशेस असतील. भूक लागली होती तरी खाण्याचे धाडस होत नव्हते. पण इथे ३ दिवस रहायचे होते. त्यामुळे खाणे तर भागच होते. पण सुरुवात केल्यावर मात्र छान वाटले. गरम गरम सूप, ब्रेड, भात व भाज्या खूपच मस्त लागले. जेवणाची सांगता चविष्ट डेझर्ट पोटात ढकलून झाल्यावर डोळे आपोआप जड व्हायला लागले. एव्हाना परत पाऊस सुरू झाला होता. त्यामुळे आमचा मूळचा कॅनॉपीवर जाण्याचा बेत बदलून पाऊस थांबल्यावर जंगलात फेरफटका मारायला जायचे ठरवले. त्या अगोदर विश्रांती आवश्यकच.





बरोब्बर ४ वाजता आम्हाला ऑफिसमध्ये बोलावले होते. चहाही तिथेच मिळणार होता. संपूर्ण फुललेल्या सोनटक्क्याच्या फुलांचा फोटो काढण्याचा मोह माझ्या नवऱ्याने इतका वेळ कसाकाय आवरला होता तोच जाणे. त्यामुळे माझी तयारी व्हायच्या आत स्वारी गेली सुद्धा. मी मुलखाची भित्री. मी कसली एकटी त्या जंगलातल्या खोलीत थांबतेय? खोलीच्या दाराला अडसर घालून मी पण ऑफिसकडे निघाले. पायऱ्या उतरायला लागले तर पायाजवळून काहीतरी टुणकन उडी मारून पळालं असं वाटलं. भास असेल, म्हणून शेवटची पायरी उतरले तर एक उदी रंगाचा, मुंगसाच्या पेक्षा खूपच मोठ्ठा, पण तसाच दिसणारा प्राणी माझी वाट अडवून उभा. आपल्या छोट्याश्या लुकलुकत्या डोळ्यांनी तो मला न्याहाळत होता. स्वारी आपल्या मागचे पाय व छोट्याश्या शेपटीवर बसून पुढच्या पायांनी नुकताच पडलेला नीरफणस कुरूकुरू खात होती. असला प्राणी मी यापूर्वी कधीच पाहिला नव्हता. मी परत जिन्यावर चढावे की काय या विचारात मागे वळले तर त्याचाच मघाशी मला नमस्कार करून (पायावरून पळालेला) पळालेला मित्र मला निरखत होता. मी किंचाळणार तोच दुरून येणाऱ्या कर्मचाऱ्याने टाळ्या वाजवल्या व मंडळी नीरफणस तसाच टाकून पळाली. नंतर समजले की हे 'अगुती' नावचे प्राणी आता बऱ्यापैकी माणसाळलेले आहेत. ह्यांचा आकार

छोट्या सश्यापासून कोकरापर्यंत केवढाही असतो. सहसा ते कुणाला त्रास देत नाहीत. नंतरच्या २ दिवसात ह्या अगुतींच्या लीला बघण्यात खूप मजा आली. खोलीच्या दारातही कधीकधी हे साहेब आरामात बसलेले असायचे. म्हणजे खोलीच्या दाराचा अडसर ह्या साहेबांसाठी होता तर!

आम्ही ऑफिसमध्ये गेलो तर तिथे एक मध्यम वयाच्या, बेताच्या उंचीच्या, उन्हाने तांबूस झालेल्या उजळ वर्णाच्या, गोल चेहऱ्याच्या, खाकी युनिफॉर्म मधल्या, तरतरीत, हसतमुख गाईडबाई आमची वाटच पहात होत्या. आमचे चहापाणी झाल्यावर त्यांनी सगळ्यांना जंगलाच्या ज्या भागात फिरणार होतो तिथली समग्र माहिती सांगितली. आता आम्हाला सूर्यकिरणांचा फारसा स्पर्श सुद्धा होत नसलेल्या ऍमेझोनच्या खोऱ्यातील जंगलात शिरायचे आहे या कल्पनेनेच अंगावर काटा आला. विशेषतः ‘अनाकोंडा’ हा सिनेमा ज्यांनी पाहिला होता त्यांना तर सगळीकडे तोच दिसू लागला तर नवल नाही. शिवाय ‘जळवा कशा न कळत पायाला चिकटतात व रक्त शोषून घेतात’ ही कुठेतरी वाचलेल्या पुस्तकातली माहिती आठवायला या पेक्षा योग्य जागा दुसरी कुठली असायला? त्यामुळे माहिती ऐकतानाच छातीतली धडधडही वाढत होती. आम्हाला दुसऱ्या खोलीत नेण्यात आले. तिथे गमबुटांच्या खूप साऱ्या जोड्या भिंतीलगतच्या शेल्फवर

उलट्या लटकत होत्या. त्यातील आपल्या पायाशी जुळवून घेणारी जोडी निवडून घ्यायला सांगितली गेली. गमबूट वेगवेगळया आकारमानाशी जुळवून घेण्यात तरबेज होते पण आमचे पाय? मी तर गुडघ्यापर्यंत येणाऱ्या गमबूटात आयुष्यात प्रथमच पाय कोंबणार होते. दोघेही एकमेकांना सर्वस्वी अपरिचित. रिश्ता व्हावा कसा? खूप वेळ माझी पाय व बूट यांच्याशी मारामारी चालली होती. पाय व बूट दोघेही पुल्लिंगी! माझं बाईमाणसाचं कोण ऐकणार? शेवटी माझ्या नवऱ्याला माझी धडपड बघवेना, त्यांच्या मदतीने पायबुटाचे सख्य झाले व कशीबशी मी तयार झाले. हे फक्त आमचेच 'बायकोबाई खुर्चीवर पाय धरून व नवरोजी त्यांचे बूट हातात धरून ओणवे किंवा जमिनीवर उकिडवे' असे नव्हते बरका! आमच्या सहप्रवाशांच्यातही हेच चालले होते. शेवटी आमची वरात ऑफिसच्या बाहेर पडली. हातात भल्यामोठ्या पर्सेस, पाठीवर पाण्याच्या बाटल्या, हातात टॉर्च, अंगाला डास पळवण्याचे औषध चोपडलेले, पायात जडजड गमबूट... अहाहा... काय मस्त अवतार होता आमचा! तो बघायला तिथला नेहमीचा रहिवासी पाऊस तर हवाच. पुन्हा थांबून पिशवीतले रेनकोट अंगावर चढवण्याचा कार्यक्रम झाला आणि सौंदर्यात भर पडली.

ऑफिसला वळसा घालून आम्ही जंगलात शिरलो. प्रथम अगदी छोटीछोटी फुलझाडे होती व मधूनच जाणारी पायवाट होती. पायवाटेवर झाडांच्या लाकडी फळ्या होत्या. त्यावर पाने व दगड, वाळू पसरलेले होते. पावसाने थोड्याश्या निसरड्या झालेल्या वाटेवरून सराईत पावले टाकत चाललेल्या गाईडच्या पाठोपाठ आम्ही सांभाळून चालत होतो. पायवाट वाटली तेवढी वाईट नव्हती त्यामुळे थोडे रिलॅक्सही वाटत होते. आता हळूहळू उजेड कमी होतोय असे वाटायला लागले कारण झाडांची उंची वाढायला लागली. वर बघितले तर आकाशही दिसेनासे झाले एवढी झाडे उंच झाली. पायवाटेचे रूपांतर आता अगदी बारीक व खाचखळग्यांनी भरलेल्या, दोन झाडांमधून जाणाऱ्या वाटेत झाले. चिखलपाण्याने आमचे बूट बरबटून गेले. बघता बघता भोवतालचे जंगल दाट होत गेले. काही ठिकाणी तर दोन झाडातून वाट काढणेही कठीण झाले. चालताना खड्ड्यात पाय पडून तोलही जात होता. पण झाडांचा आधार अजिबात घेऊ नका असा आमच्या गाईडचा सक्त हुकूम होता. ती आणखीही बरेच काही सांगत होती पण ऑफिस मधल्या लेक्चरमधले बरेचसे डोक्यावरून गेल्याने व चालण्याच्या नादात असल्याने सगळे ‘नळी फुंकिली सोनारे’ असे झाले. आम्हाला वाटले की झाडांच्या काळजीने ती असे सांगतेय की काय! पण तिच्या सांगण्याकडे लक्ष्य न दिल्याचा

परिणाम लगेच कळला. आमच्यापैकी एकीने तोल सावरायला म्हणून एका झाडाला नुसती २-३ बोटे टेकवली मात्र, क्षणभरात तिचा हात मुंग्यांनी भरला की! ती हात झटकायला लागली तर त्या मुंग्या सगळीकडे पसरायला लागल्या, बऱ्याचशा खालीही पडल्या. हे सगळे होताना नुसते पहाण्या पलीकडे कोणीच काही करू शकत नव्हते. सगळे किती झटपट झाले पण मुंग्यानी तेवढ्यातही आपला इंगा दाखवून दिला. त्या फायर ऍंट म्हणून ओळखल्या जातात. आकाराने नेहमीच्या लाल मुंग्यापेक्षा कितीतरी मोठ्या, काळपटलाल रंगाच्या ह्या मुंग्या झाडाच्या खोडातल्या फटीत घट्ट चिकटून धावत असतात व दुसरा काही आधार मिळाला तर खूपच झपाट्याने त्यावर चढतात. त्यांचा दंश नेहमीच्या मुंग्यांपेक्षा कितीतरी जास्त तीव्र असतो. अगदी भाजल्यासारखी जळजळ व वेदना ५-६ तास तरी जाणवते. मध्येच थोडीशी मोकळी जागा मिळताच तिथे थांबून बघितले तर हात चांगलाच लाल झाला होता. मुंग्यांचा प्रताप कळल्यावर सगळेजण जास्तच काळजीपूर्वक चालायला लागलो.

थोडे पुढे गेल्यावर आमची गाईड एक ठिकाणी थांबली. आता थोडी मोकळी जागा लागली होती. मोठी मोठी झाडॆ जरा दूर होती त्यामुळे सूर्य आम्हाला मधून मधून दिसत होता. पायाखालची वाटही

झाडांच्या वाळलेल्या साली पडून थोडी बरी झालेली होती. आमच्या गाईडने एका ३ फुटी उंच असलेल्या झाडाची काही पाने तोडली, एक एक आमच्या हातात दिले व त्याचे देठ चोखायला सांगितले. कोणाचेच मन अशा न धुतलेल्या, अनोळखी पानाला तोंड लावायला तयार होईना. शेवटी तिनेच ते स्वतःच्या तोंडाला लावले तेंव्हा कुठे आम्ही तयार झालो. एकमेकांकडे पहात हळूच प्रत्येकाने पानाला जीभ लावण्याचे धाडस केले. पानाच्या देठातला रस जीभेवर पसरताच तो पेपरमिंट सारखा वाटला. म्हणून जरा जोरात चोखला तर काय... जीभ एकदम जड झाली. अगदी दात काढताना डॉक्टरांनी इंजेक्शन देऊन तोंड बधीर करावे तशी! तोंडातून शब्द फुटेना. हे झाड ऍनेस्थेशियाचा परिणाम करणारं होतं. जवळ जवळ १५-२० मिनिटे तरी जीभ व गालाची बधीरता टिकली. आमची तोंडे गप्प होती त्यामुळे त्या संधीचा फायदा घेऊन गाईडने त्या झाडाचे नाव, त्याचे उपयोग, त्याची बोटॅनिकल जात वगैरे बरचसं काहीबाही सांगून टाकल. अजूनही पेरूमधल्या ग्रामीण भागात ह्या झाडाच्या रसाचा उपयोग काही शस्त्रक्रिया करताना करतात एवढीच माहिती काय ती लक्षात राहिली.

पुढच्या आमच्या भटकंतीत बरीच विविध झाडे बघितली, त्यांची बरीचशी माहिती डोक्यात साठवण्याचा केविलवाणा प्रयत्नही केला व नंतर नंतर सगळया माहितीची मस्तपैकी सरमिसळही करून टाकली. काहीकाही झाडे मात्र अगदी पक्की डोक्यात बसली. ‘चालणारा पाम’ हे त्यापैकी एक. अंदाजे ५० फुटांपेक्षाही जास्त उंचीचे. ५-६ फूट लांबीची आकाशाकडे सूर्यप्रकाशासाठी तळहाताप्रमाणे पसरलेली पाने, मधले सरळसोट खोड, त्याचे पाय म्हणजे मुळे असे हे पामचे झाड राखाडी, पांढरट, मधूनच निळसर छटा दाखवणारे. त्याच्यावरच्या टोकदार काट्यांमुळे त्याच्यापासून सगळ्यांना थोडेसे लांबच ठेवत होते. त्याची मुळे जमीनीच्याखाली तर रूतलेली होतीच पण ६-७ फुटांपेक्षाही जास्त उंचीची जमिनीच्यावर दिसत होती. त्यामुळे हे झाड जणू काही स्टील्ट्वर उभे आहे असे दिसत होते. जुनी मुळे काही काळानंतर कुजतात व मरतात. पण त्या आधीच नवीन मुळे खोडातून जुन्या मुळांच्या वरच्या बाजूने निघून जमिनीत आपले पाय घट्ट रोऊन उभी असतात. झाडाला त्या नव्या मुळांचा आधार मिळतो, नव्या उंचीवरून निघालेल्या मुळांमुळे झाडाची उंची वाढते, झाडाची जागा व दिशा बदलते.



ही सगळी क्रिया अतिशय संथ असते पण बरीच वर्षे बारकाईने निरीक्षण केले तर झाड मूळच्या जागेपासून काही अंतर दूर गेलेले दिसते. म्हणून ह्या झाडाला `चालणारे पामचे झाड (Walking Palm)' असे म्हणतात. सगळे ऐकून खूप मजा वाटली. पामची भेट घेतल्यावर आम्ही गाईडच्या मागून अगदी काळजीपूर्वक घनदाट जंगलातील पायवाटे वरून चालत होतो.




अचानक आमची गाईड थांबली, तिने खाली वाकून काहीतरी उचलले व दाखवले तर तिच्या हातात एक भलामोठा शंख दिसला. तिने तो शंख "कोण हातात घेतय?" असे विचारताच सगळे दोन पावले मागे सरकले. कारण आता त्या शंखाखालून काहीतरी वळवळताना दिसू लागले. असल्या कामात पुढे माझा नवराच असणार हे एव्हाना सगळ्या सहप्रवाशांना माहीत झालेच होते. त्यामुळे त्यांच्या नजरातले भाव बघून ह्यांनी तो शंख तळहातावर घेतला. पहाता पहाता त्या शंखातली वळवळ एकदम वाढली व ह्यांच्या तळहाताएवढी मोठी गोगलगाय आपला पसारा पसरून ह्यांच्या तळहातावर विसावलेली दिसली. तिचे कूळमूळ सगळयाबद्दल माहिती ऐकुन झाल्यावर तिला परत झाडांच्या जवळ सोडून आमची वरात पुढे निघाली. या नंतर आम्हाला आमच्या गाईडने परत एका झाडाची पिवळसर रंगाची, डाळिंबाच्या जातीची पण आकाराने लहान अशी फळे चाखण्यास दिली. ती फळे कशाची, त्याचे गुणधर्म, जातकुळी वगैरे बरीच माहिती गाईडने सांगून आमच्या माहितीत भर घातली पण हे असले काही आपल्या खाण्यात परत येण्याची शक्यता नाही, तेंव्हा माहितीपेक्षा फलाहार जास्त छान या सबबीवर सगळे फळांचा आस्वाद घेण्यात रंगले. थोडा फलाहार झाल्यावर आम्ही पुढे निघालो. आपण जंगलातल्या कुठल्या भागातून आत शिरलो व आत्ता

कुठे आहोत हेच कळेनासे झाले होते. गाईडने आम्हाला एका झाडाचे प्रत्येकी एकेक पान तोडायला सांगितले व ते तळहातावर कुस्करायला सांगितले. सगळ्यांचे हात हिरवेगार झाले. गाईडबाई माहिती सांगत होत्या त्या वेळात मंडळी हातावरचा पानांचा चोथा झटकण्यात गर्क होती. साधारण १०-१५ मिनिटे गेली असतील तोच आमचे हात लाल व्हायला लागले, व थोड्या वेळात ते गडद जांभळे झाले. हेच त्या झाडाचे वैशिष्ठ्य होते. खूप वेळपर्यंत हातांवर जांभळट रंग होता. या वैशिष्ट्याचा उपयोग कापड रंगवण्यासाठी करतात म्हणे. आणखीही अशाच बऱ्याच झाडांच्या जाती, वाटेत येणारे मोठ्ठेमोठ्ठे कोळी, मुंग्या, सापसुरळीसारखे प्राणी पहात बरेच हिंडलो व २-३ तासांचा फेरफटका मारून परत जंगलाच्या बाहेर आलो.

एव्हाना संध्याकाळचे ६ वाजले होते. बाहेर उजेड असला तरी जेवणघरात, ऑफीसमध्ये बराच अंधार जाणवत होता. विजेचे दिवे अजून पेटले नव्हते. त्यामुळे जंगलाच्या पार्श्वभूमीवर, कंदिलाच्या प्रकाशात फिरणाऱ्या आमच्याच सावल्या मनावर एकप्रकारचे दडपण आणत होत्या. रातकिड्यांच्या किरकिरण्याने त्यात भरच पडत होती. गरमगरम कॉफीचे घुटके घेताना मात्र खूपच छान वाटत होते. आता पायातले गमबूट जडजड वाटायला लागले होते. पण आमचे नेहमीचे बूट तर खोलीत. त्यामुळे पाय ओढत, रमतगमत

खोलीकडे मोर्चा वळवला. आमच्या खोलीकडे जातानाच्या वाटेवर एका टोपलीत काही सुक्या बिया व एक लाकडात बसवलेला अडकित्ता ठेवलेला दिसला. जवळ गेल्यावर ते ब्राझील नट्स आहेत हे कळले. सिंगापूरला ते पाहिले होते. लगेच ते अडकित्त्याने फोडून खाण्यात आले. सहप्रवाशांनाही ते दाखवले. थोडी गम्मत. ‘ह्या बाईंना बरीच माहिती आहे हो’ म्हणून फुकटात भाव पण खाल्ला. बघतबघता आमच्या खोलीपाशी येईपर्यंत अंधार पडला. खोलीच्या पायऱ्यांवर २, टॉयलेट मध्ये १ व पलंगापाशी १ असे ४ कंदील तिथल्या कर्मचाऱ्यांनी एवढ्या वेळात आणून ठेवले होते. अजून वीज चालू झाली नव्हती, पंखा नव्हताच त्यामुळे खूप गरम होत होते. आम्ही व्हरांड्यात हॅमॉकवर बसण्याची चैन केली. बऱ्याच दिवसात एकमेकांशी बोलायला वेळ मिळाला नव्हता तो आत्ता सापडला. जेंव्हा आपण अशा वातावरणात फक्त २-४ दिवसच रहाणार आहोत याची खात्री असते तेंव्हा असे बदल खूपच छान वाटतात याचाही पुनःप्रत्यय आला.

इतके सगळे होईपर्यंत जेवणाची वेळ झाली. गरमगरम सूप, ब्रेडने सूरूवात करून भाज्या, भात कधी पोट तृप्त करून संपला कळलेच नाही. आमचे गाईड मयुरेश भट वेगवेगळ्या चवींचे पदार्थ पण आम्हा

शाकाहारींनाही चालतील असे बनवून घेण्यात एकदम पटाईत. त्यामुळे कुठेही माझी कधीही उपासमार झाली नाही. ह्यांना तर त्यांनी माशांचे, पेयांचे विविध प्रकार खायला घातले. जेवणात सगळीकडेच चीजचे प्रमाण भरपूर. त्यामुळे कुरकुरीत ब्रेडवर चीज व भाज्या पसरल्या की पिझ्झा खाल्ल्यासारखे समाधान. जेवणानंतर चहा कॉफीही होती. त्याचा आस्वाद घेत होतो तोच मयुरेश भटांनी जाहीर केले की "आपण लगेचच रात्रीच्या बोट सफरीवर जाणार आहोत. तुमच्या खोलीत डास प्रतिबंधक लोशन ठेवले आहे ते लाऊन हवे असेल तर खोलीतले टॉर्च घेऊन या. " इतरांचे माहीत नाही पण मला मात्र आम्ही बोटीतून उतरल्यानंतरचा निसरडा चढ दिसायला लागला. दिवसा ती सर्कस एकवेळ ठीक होती पण रात्रीच्या मिट्ट काळोखात...! माझ्या मनाने न जाण्यासाठी काय पळवाट शोधावी याचा विचार ताबडतोब सुरू केला. पण तितक्यात एक अगुती टुणकन उडी मारून गेला अन माझा विचार बदलला. त्या अगुतीच्या सहवासात कंदिलाच्या प्रकाशात खोलीत किंवा रिसेप्शनपाशी बसण्यापेक्षा सर्कस परवडली. डासविरोधी लोशन अंगाला चोपडून आमची वरात चांदण्याच्या अंधुक प्रकाशात निसरड्या लाकडी पायऱ्यांवरून हेलपाटत,

ज्याचा जमेल त्याचा हात पकडत बोटीत स्थानापन्न झाली. मोटरबोटीने जोरदार फुर्र्र्र्र्र केले व आम्ही किनारा सोडला.





आम्ही इथे आलो होतो तीच बोट आत्ताही होती. बोटीच्या दोन्ही बाजूंना बसून आम्ही नदीची मजा पाहू लागलो. सकाळी जी नदी उन्हात चमकताना तांब्याच्या रसाची आहे असा भास होत होता, तीच आता पूर्ण काळीभोर दिसत होती. आमच्या हॉटेलचे कंदील आपला प्रकाश आमच्यापर्यंत पोहोचवू शकत नव्हते. दुसऱ्या किनाऱ्यावरही पूर्ण अंधार. मोटरबोटीचा आवाज सोडला तर दुसरा कुठेही कसलाही आवाज नव्हता. पाण्याच्या लाटांचा बोटीवर आपटून होणारा चुबुकडुबुक आवाज बोटीच्या आवाजात मिसळून गेला होता. वातावरणात एकूणच गंभीरता जाणवत होती. बोट आता नदीपात्राच्या मधल्या धारेमधून जात होती. मी बाहेरच्या बाजूला थोडं झुकून आकाशाकडे पाहिले आणि "आहाहा" असे उद्गार आपोआपच तोंडून निघाले. मधून मधून डोकावणारे ढगांचे पुंजके सोडले तर नजर जाईल तिथपर्यंत गडद निळे आकाश चांदण्यांनी नुसते चमकत होते. मला कुठलीच नक्षत्र ओळखता येत नाहीत. पण चांदण्यांचा जो काही पसारा दिसत होता तो एकदम अफलातून. लहानपणीच्या "मुठभर लाह्या त्यात चांदीचा रूपया " या कोड्याची आठवण झाली. लाह्या पसरलेल्या दिसत होत्या पण रूपयाचा पत्ता नव्हता. बोट जसजशी पुढे जाईल तसतसे आकाश जास्तच शोभिवंत दिसत होते. आम्ही ते बघण्यात पूर्ण रंगून गेलो होतो तोच अचानक

सगळीकडे शांतता पसरली. एवढा वेळ चालू असलेले मोटरबोटीचे इंजीन अचानक बंद झाले. आमची स्थानिक गाईड बोटीच्या शेपटाकडून अचानक पुढच्या भागात तिचा पॉवरफुल टॉर्च घेऊन धावली, बोट बऱ्यापैकी हिंदकाळली. काय झाले ते समजेना. माझ्यासारख्या पोहता न येणाऱ्या बाईची काय अवस्था झाली असेल विचार करा! तेवढ्यात बोटीच्या कॅप्टनने बोट थोडीथोडी किनाऱ्याजवळ आणली. आमचे लक्ष आता बोट का थांबली असेल याकडे लागले. गाईडबाई किनाऱ्यावर मधून मधून प्रकाशझोत टाकून काहीतरी शोधत होत्या. आता त्या प्रकाशात नदीकाठचा परिसर न्हाऊन निघाला. नदीकडेला उंच मातीची भिंत उभी होती, त्यावर झाडे होती आणि त्यांच्याखाली उभे राहून हरणाच्या आकराचे काही प्राणी आम्हाला न्याहाळत होते. हे अगुतीच्याच जातीचे, तसेच करड्या रंगाचे, पण कोकराएवढ्या आकाराचे प्राणी होते. हे प्राणी सहसा निरुपद्रवी असतात व कळप करून हिंडतात. त्यांचे फोटो काढून झाल्यावर आमची बोट निघाली.

पुढे सगळीकडे कानोसा घेत व टेहळणी करत आम्ही खरं तर सुसर शोधत होतो. पण ती त्यावेळी बहुधा दुसरीकडे पर्यटनाला गेली असावी त्यामुळे तिची गाठ पडली नाही. तरी सुद्धा आम्ही घुबड, कोल्हा, पांढरे

पक्षी, विषारी बेडूक, पाणसाप वगैरे बरेच काही पाहिले. हे प्राणी पहाण्यापेक्षाही मला ती काळीभोर नदी, त्यात चमचमणारे चांदण्यांचे प्रतिबिंब, आमच्या बोटीमुळे उठणाऱ्या लाटा, निळे आकाश, त्यात रेंगाळत जाणारे ढग, आजुबाजूचे जंगल, रातकिड्यांची किरकिर व त्यातून सैर करण्याचे आमचे रात्रीचे साहस हेच सगळे खूप खूप रोमहर्षक होते. जवळपास दोन तास आम्ही बोटीत घालवून हॉटेलवर परतलो. इतका वेळ गायब असलेल्या विजेने आपली हजेरी लावल्यामुळे रिसेप्शन, ऑफिस उजळून निघाले होते पण त्यामुळे तिथपर्यंत जाणारी पायवाट, आजुबाजूचे जंगल जास्तच अंधारात बुडाले होते. आमच्या टॉर्चचा आता उपयोग झाला. कंदिलाचा प्रकाश आम्हाला सोबत करत होताच. त्याच्या प्रकाशात आम्ही खोलीत पोहोचलो. पलिकडूनच नदी वहात होती. तिचा आवाज आता स्पष्ट ऐकायला येऊ लागला. आमच्या खोलीचा एकदम कायापालट झाला होता. सकाळपासून ज्या भिंती जाळीमुळे पारदर्शक दिसत होत्या त्या आता स्वच्छ पांढऱ्या पडद्यांनी पडदानशीन झाल्या होत्या. पलंगावरची मच्छरदाणी सोडून शिस्तीत नीटनेटक्या गादीखाली खोचलेली होती, लव्हेंडरचा सुवास पसरवणारी मेणबत्ती पलंगाशेजारील टीपॉयवर तेवत होती, कंदील पेटलेले होतेच, पाण्याच्या स्वच्छ बाटलीत पाणी भरलेले होते. दिवसभराची दमणूक,

आयुष्यात कधीही केली नसेल एवढी दगदग, रातकिडे व बेडुक याची अंगाईगीते आणि अशी स्वच्छ खोली... बस! आणखी काय हवे असणार? हे सर्व करणाऱ्या सेवकांना मनातल्या मनात धन्यवाद देत निद्रादेवीच्या आधीन कधी झालो कळलेसुद्धा नाही.

सकाळी पक्षांच्या किलबिलाटाने, खारूताईंच्या शिट्टीने व सोनटक्क्याच्या सुवासाने लवकरच जाग आली. लगेच आम्ही दोघे फेरफटका मारायला बाहेर निघालो. खोलीचे दार उघडताच पहिली भेट झाली अगुती महाशयांची. ते आरामात नीरफणसाच्या झाडावरून पडलेल्या फणसाची न्याहारी करत बसले होते. त्यांनी आमची जराही दखल घेतली नाही, इतकच काय पण "न्याहारी करणार का "असे विचारण्याची औपचारिकताही दाखवली नाही. ते आपले त्यांचा फणस खाण्यात गर्क होते. आम्हीही आता बऱ्यापैकी धीट झालो होतो. त्यांच्याकडे दुर्लक्ष करू पुढे सरकलो. रेस्टॉरंटकडे जाणाऱ्या पायवाटेवर दोन्ही बाजूंना जास्वंदी व सोनटक्का फुलला होता. कालच्या पावसामुळे स्वच्छ झालेल्या तुकतुकीत पानांमधून डोकावणारी जास्वंदीची विविध रंगातली फुले भरभरून नेत्रसुख देत होती. जमिनीवरच्या गवतावरचे दवबिंदू पहाटेच्या सूर्यकिरणांत अगदी हिऱ्यासारखे चमकत होते. मधूनच पळणारी खारूताई, टुणकन उडी मारणारे

बेडूक व शेपटीवर बसून टुकुटुकू बघणारे अगुती त्या निसर्गचित्रात सौंदर्याची भरच घालत होते. या अशा रम्य वातावरणात गरमागरम वाफाळता चहा... वाः! क्या बात है!

काल पावसामुळे हुकलेला कॅनॉपी डे आज होता. त्यासाठी थोड्याच वेळात आम्ही परत गमबूटधारी होऊन कॅनॉपीकडे निघालो. बोटीत बसण्याची सर्कस होतीच. पण सवय झाल्याने का कालच्या पावसामुळे नदीचे पाणी वाढल्याने थोड्या पायऱ्या कमी भासल्यामुळे असेल पण बोटीत बसणे तेवढे अवघड वाटले नाही खरे. नदी तीच पण काल रात्रीपेक्षा खूप वेगळी दिसत होती. परत कोणीतरी पाण्यात चॉकलेट मिसळल्यासारखे पाणी दिसत होते. पाण्याची ओढही चांगलीच जाणवत होती. एक तास प्रवास करून आम्ही अगदीच वेगळया जंगलात आलो. इथेही त्याच गाईडबाई आमच्याबरोबर होत्या. त्यांनी आम्हाला मसाल्यांची झाडे असणाऱ्या बागेत नेले. वेगवेगळया मसाल्यांची झाडे पहात आम्ही त्यांच्यामागून फिरत होतो. जवळपास एक तासाचा फेरफटका झाल्यावर आम्ही कॅनॉपीजवळ आलो. मान वर केली तर आकाश दिसतच नव्हते. सगळीकडे उंचच उंच झाडे. काही झाडे सरळसोट उंच तर काही आपला फांद्यांचा पसारा पसरून बसलेली, वेगवेगळया उंचींची, मान वर करून आकाशाकडे बघणारी. किती प्रकारांची झाडे होती,

त्यांची वैशिष्ट्ये काय अशी बरीच माहिती कानावरून जात होती. अशी माहिती ऐकताना बी. एस. सी च्या अभ्यासात कुठे कुठे काहीतरी वाचल्याची आठवण होत होती. पण ते तेवढ्यापुरतेच. परत आत्ता विचाराल तर पाटी कोरीच! नवीन माहिती छोट्याश्या डोक्यात साठवण्यापेक्षा आजुबाजूचे निसर्गातले दृश्य शिक्षण या वयात जास्त महत्वाचे वाटत होते. अचानक माझी नजर माझ्या समोर असलेल्या झाडावर जमिनीपासून सुमारे ४-५ फूट उंचावर असणाऱ्या राखाडी तपकिरी बांडगुळासारख्या गोळ्याकडे गेली. तो कशाचा आहे हे विचारण्या अगोदरच त्यात काहीतरी हालचाल दिसायला लागली. बारकाईने पाहिले तर ते मुंग्यांचे वारूळ होते. आत्तापर्यंत मी मुंग्यांचे वारूळ जमिनीवर असलेले पाहिले होते. पण ह्या विशिष्ट जातीच्या मुंग्या असे झाडावरच आपले घर करतात. (या मुंग्यांचे आणखीही वैशिष्ट्य असे की, त्यांची चव पेपरमिंटसारखी असते. आपल्या नेहेमीच्या मुंग्या चवीला आंबट असतात म्हणे! त्यांची चव घ्यायला माझा नवरा सोडून दुसरे कोणी धजावले नाहीत. )

मुंग्याच फक्त असे करतात असे नाही तर इतर कीटकही वेगवेगळ्या उंचीवर आपले बस्तान बसवतात. त्या उंचीची, तिथला सूर्यप्रकाश, वारा, पाऊस/पाणी, उपलब्ध खाद्याची त्यंना इतकी सवय झालेली असते

की चुकून त्यांच्यापैकी कोणी खाली जमिनीवर पडला तर तो त्या उंचीवर लवकरात लवकर पोहोचायचा प्रयत्न करतो आणि जमीनीवरचा कीटक चुकून वर गेलाच तर तो ताबडतोब खाली येतो. ऐकून खूपच गंमत वाटली.

एव्हाना आम्ही कॅनॉपीपर्यंत येऊन पोहोचलो होतो. शंभर-सव्वाशे पायऱ्यांचा भला मोठा मनोरा समोर उभा होता. जमिनीत रोवलेल्या चार भक्कम खांबांच्या चौकटीभोवती दर ८ ते १० पायऱ्यांनंतर काटकोनात वळणे घेणारा, मध्ये कुठेही बसण्याची सोय नसणारा हा सुमारे ३ फूट रुंदीचा, लाकडी पायऱ्यांचा, वरचेवर पडणाऱ्या पावसाने शेवाळलेला जिना प्रथमदर्शनीच मनात धडकी भरवत होता. खालून मान उंच करून पाहिले तर छातीच दडपली माझी. १०० फूट म्हणजे १० मजल्यांची उंची झाली की! एवढे चढून जायचे ? बापरे! कसं काय जमणार ? “निदान थोडेसे उंचावर तरी चढून बघ, नंतर हवं तर परत ये “ असे मला सांगून गाईडबाईंच्या मागोमाग माझा नवरा पहाता पहाता वर पोहोचला सुद्धा! त्यांच्यानंतर त्यांच्यापेक्षा वयाने मोठे असलेलेही इतर सहपर्यटक चढायला लागले ते पाहून माझी मलाच लाज वाटली. लाजेकाजेखातर का होईना थोडातरी प्रयत्न करूया म्हणून मी पहिल्या पायरीवर पाय टाकला, सहज वर पाहिले तर ‘मी काय

करतेय, वर येतेय का नाही' हे बघण्यासाठी हे सगळयात वरच्या प्लॅटफॉर्मच्या काठड्यावरून इतके वाकले होते होते मी दिसले नाही तर ते आणखी वाकतील या भीतीने मी वर कधी चढून गेले माझे मलाच कळले नाही. वर पोहोचेपर्यंत जाम धाप लागली होती, घामाने पूर्ण आंघोळ झाली होती तरीही वर पोहोचल्यावर जे काही दृश्य दिसले ते पाहिल्यावर सगळा शीण दूर झाला.






आपण नेहमी झाडांकडे मान उंचाऊन पहातो इथे काही झाडे मान उंचाऊन, काही बरोबरीच्या नात्याने समपातळीवरून तर काही ‘आमची टाळू पहायला अजून तुम्हाला तुमची उंची खूप वाढवायला हवी’ असे सांगत आमच्याकडे पहात होती. खालच्या उंचीवरच्या झाडांच्या शेंड्यावर कावळे, चिमण्या, बूबू असे पक्षी होते तर समपातळीवरच्या झाडांवर त्यांच्या पेक्षा छोट्या आकाराचे पक्षी होते. दूरवर असणाऱ्या उंच झाडांच्या मधल्या फाद्यांवरून केकाटणारी माकडे (हौलिंग मंकी) आमच्याकडे नवलाईने पहात होती. झाडाची उंची जेवढी जास्त तेव्हढे त्यावर वस्ती करणाऱ्या मंडळीचे आकारमान लहान ही नवीनच माहिती कळली. इतके उंच चढून वर गेलो होतो तरी सूर्याची किरणे झाडांच्या फांद्यांच्या पसाऱ्यातून अधूनमधूनच डोकावत होती. आम्ही उभे होतो तो पहिल्या मनोऱ्याच्या सर्वात वरचा प्लॅटफॉर्म होता. तिथले आजुबाजुचे दृश्य बघून ७-८ पायऱ्या उतरून पहिल्या प्लॅटफॉर्मवर आम्ही उतरलो. अंदाजे १०-१२ चौ. फुटांचा हा प्लॅटफॉर्म क्वीनीला या झाडाच्या लाकडाच्या फळया वापरून, यलो मोंबीन झाडाच्या साधारण ३/४ उंचीवर झाडाच्या भक्कम खोडाला लाकडी चौकटीच्या आधाराने बांधला होता.



आजुबाजूंच्या झाडांचाही आधार मोठमोठ्या सळयांच्या, दोरांच्या सहाय्याने प्लॅटफॉर्मला दिलेला होता. इथेही आजुबाजूला कुठे हात लावण्याची सोय नव्हती कारण सर्वत्र मुंग्या व मुंगळयांचा संचार! दृष्टी जाईल तिथवर हिरव्या रंगाच्या विविध छटा दिसत होत्या. पानांचे आकार तर अगणितच. लहान, मोठी, सरळ, लांबूळकी, गोल... किती प्रकारची पाने होती म्हणून सांगू? आमच्या पेक्षा खालच्या उंचीवरच्या झाडांचे शेंडे, आमच्या पातळीवरच्या झाडांच्या फांद्या व पानांचे पसारे तर मोठ्या उंच झाडांचे प्रचंड मोठे बुंधे... पहावे तितके नेत्रसुख होते. मी तरी जे दिसतंय त्यावर खुश होते पण आमच्या गाईडबाई आम्हाला तिथच थांबू द्यायला तयार नव्हत्या. आम्ही इकडे तिकडे पहात होतो तोवर त्या २ वेळा सिमेंटच्या रस्त्यावरून चालाव्यात तितक्या आरामात पहिल्या झुलणाऱ्या पुलावरून पलिकडे भराभर जाऊन परत आल्या होत्या. आम्हाला त्या पुलावरून पलिकडे जाताना कोणती काळजी घ्यायची ते सांगून पहाता पहाता त्या पुनः पलिकडे गेल्या व दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर उभे राहून ओरडून आम्हाला बोलावू लागल्या.



आत्ता कुठे आम्हा सगळयांचे लक्ष इन्काटेराच्या प्रसिद्ध कॅनॉपी कडे वळले. २००५ साली पर्यटकांसाठी तयार केलेल्या कॅनॉपीवरून आम्ही जमिनीपासून सुमारे १०० फूट उंचीवरून झाडांच्या वरून चालणार होतो या कल्पनेतच इथे पोहोचण्यापूर्वी खूप थ्रिल वाटत होतं. पण आता प्रत्यक्ष ती कसरत करायची म्हणजे थ्रिलपेक्षा भीतीच जास्त वाटायला लागली. सुरक्षिततेची पूर्णतया काळजी घेऊनच या कॅनॉपीची बांधणी केलेली आहे. जगातली सर्वात मोठी व सुरक्षित अशी ही कॅनॉपी एकंदर ३४४ मीटर लांबीची आहे. दोन भक्कम टॉवरच्या मध्ये सहा पूल व आठ प्लॅटफॉर्म आहेत. उत्तम सामान वापरून बनवलेल्या उभ्या समांतर जाळीच्या मध्ये पाय ठेवण्यासाठी ठोकलेल्या आडव्या फळयांवरून हळूहळू चालत पुढच्या फलाटाकडे आम्हाला पोहोचायचे होते.


"दोन्हीबाजुंच्या जाळीच्या वरच्या कडेला घट्ट पकडून खालच्या लाकडी फळीवर पाय ठेवून चालायचे, कोणत्याही परिस्थितीत डाव्या उजव्या बाजूला झुकायचे नाही, जाळी स्वतःपासून दूर करायची नाही, मध्ये थांबायचे नाही" गाईडबाईंच्या सूचना चालू होत्याच. सगळे जण त्या ऐकण्यापेक्षा "इथून कसे पळून जाता येईल?" याच विचारात गर्क होते. तेवढ्यात गाईडबाईंच्या सूचना रिपीट करून हे बघताबघता दुसऱ्या फलाटावर पोहोचलेही. मी पण देवाचे नाव घेतले एकदा ह्यांच्याकडे बघितले व कॅनॉपीच्या पहिल्या पुलावर पाउल टाकले. पायाखालच्या फळया पावसाने व उंचावरच्या झाडावरून गळून पडणाऱ्या उंबराच्या जातीच्या फुटलेल्या फळांनी व पक्षांच्या प्रातर्विधीने बुळबुळीत झालेल्या होत्या. गाईड्बाईंनी आमच्या आधी फळयांवरून जाऊन त्या फळया बऱ्यापैकी स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला होता, तरीही न घसरता ताठपणे चालण्यासाठी मला बरेच प्रयत्न करावे लागले. त्यातच नजरही खाली जमिनीकडे गेली. मग काय! पाय लटपटणे आणखीच जोरात!

कसेबसे १९-२० मीटरचे अंतर कापले व 'जितं मया' अशा आविर्भावात दुसऱ्या फलाटावर पोहोचले. तोही यलो मोंबीनच्याच आधाराने उभा होता. आता मी धीट झाल्यासारखी त्या फलाटवर फिरणे, आजूबाजूची झाडे पहाणे, पक्षी निरीक्षण करणे असल्या ' व्हीआयपी ' लीलाही करायला लागले. तेवढ्यात दुसऱ्या पुलावर जायची वेळ आली व बघताबघता पुढचे पाच पूल कधी ओलांडले कळलेही नाही. मधले दोन पूल खूपच लांब म्हणजे ३६ व ४१ मीटरच्या जवळपास होते पण तोवर त्या झुलणाऱ्या पुलांवरून चालण्याची युक्ती समजली होती व सवयही झाली होती. आणखी एक फरक लक्षात आला. नदीवरचा किंवा रस्त्यावरचा खूप उंचीवरच्या हलत्या पुलावरून चालणे व हे पूल पार करणे ह्यात मुख्य फरक पुलावरून खाली दिसणाऱ्या दृश्यामध्ये होता. नदीवरच्या काय किंवा रस्त्यावरच्या काय पुलावरून थेट आपण किती उंचावरून चालतोय हे कळते व जास्त भीती वाटते.

इथे कॅनॉपीवरून खाली बघितले तर थोड्याश्याच उंचीवर झाडांचे शेंडे व पानांचा पसारा दिसतो, जमिनीचे दर्शन जवळपास नाहीच. त्यामुळे उंचीची भीती खूपच कमी वाटते व आपण मजेत सगळे पूल पार करतो. सहा पुलांच्या नंतर खरतर आता सातव्या पुलापलिकडे जाण्याची इच्छा नव्हती. पण समोरून खुणावणारे ट्री हाउस थांबूही देत नव्हते. हा पूल ओलांडून गेले तर परतही त्याच पुलावरून यायला हवे होते कारण खाली उतरण्याचा जिना सहाव्या पुलानंतर होता. ट्री हाऊस हा 'डेड एंडच' होता म्हणाना त्या कॅनॉपीचा! शेवटी दमलेल्या पायांना 'नंतर आराम देण्याचं' आश्वासन देऊन समोर असलेला सातवा पूलही पार केला व झाडावर बांधलेल्या ट्री हाऊसमध्ये थोडावेळ बसण्याची गंमत अनुभवलीच. परत येऊन १०० फूटांचे जिने उतरून खाली आलो. आजपर्यंत असले कुठलेही साहस न केलेल्या मला हा अनुभव फारच विलक्षण व आनंदाचा होता.

आता यापुढचा आमचा प्रोग्रॅम जेवणानंतर ‘सॅंड ओव्हल ’या तळ्यातील बोटिंगचा होता. उतरत्या निसरड्या पायऱ्यांवरून उतरून नदीतील नावेत बसून आम्ही थोड्याश्या अंतरावरच्या तांबोपाटाच्या राष्ट्रीय जंगलात गेलो. नदीकाठ सोडून आम्ही वेगवेगळया उंचीच्या झाडांच्या ‘टेरा फर्मा ’ या भागातून व आजुबाजूची झाडे, वनश्री पहात अंदाजे एक तासभर चाललो. नुकताच पाऊस पडून गेला होता त्यामुळे वातावरण खूपच आल्हाददायक होते. जंगलातला फेरफटका संपवून आम्ही ‘सॅंड ओव्हल ’ लेकपाशी पोहोचलो. पुन्हा निसरडा रस्ता उतरणे भाग होते. पण आता जरा जरा सवय झाली होती. गढूळसर पाणी उन्हात चमकत होते व आमच्यासाठी ६-७ माणसे बसू शकतील इतक्या छोट्या नावा पाण्यावर डुलत आमची वाट पहात होत्या. ४-५ पावले पाण्यातून चालूनच यावेळी नावेत बसलो.






नावाड्याने लांबलचक बांबू पाण्यात रोवला अन आम्ही तळयाच्या मध्यात पोहोचलो. तसे तळे खूप मोठे होते असे नाही पण मधोमध असलेल्या जमीनीच्या उंचवट्याला व त्यावर असणाऱ्या झाडांना वळसे घेऊन जात होते. पाणी भरपूर खोल असावे असे त्यात रोवल्याजाणाऱ्या बांबूमुळे वाटत होते. काठावरची झाडे आपले प्रतिबिंब पहात होती. आमच्या नावेच्या पाण्यात शिरण्याने पाण्याच्या पृष्ठभागावर जे तरंग उठत होते त्यावर उन्हाचे छोटे छोटे कवडसे नाचत होते. नावा हळूहळू काठ सोडून पाण्यात शिरल्या. एक वळण घेतले व समोर दिसणारे दृश्यच बदलले.



तळयाच्या दुसऱ्या काठावर बरीच झाडे दाटीवाटीने आपापला फांद्यांचा व पानांचा पसारा सांभाळून उभी होती. दूरून त्यावर निळया, पिवळया रंगांची फुले फुलली असावीत असे दिसत होते. जसजसे त्या झाडांच्या जवळ जाऊ लागलो तसतशी त्या फुलांची हलचाल होतेय असे दिसायला लागले. खूपच आश्चर्य वाटू लागले. आणखी जवळ जाताच चक्क फुलांच्या ऐवजी पिवळे, निळे पंख असणारे अतिशय सुंदर पक्षी हालचाल करत होते असे दिसले. दूरून दिसणाऱ्या फुलांच्या जागी पक्षी असलेले पाहून खूप गंमत वाटली.



लाल मान, निळे, हिरवे, पिवळे रंग असलेले मॅकॉ जातीचे पक्षी कळप करून झाडांवर बसलेले होते. हे पक्षी दिसायला अतिशय सुंदर आहेत. ते फळे, शेंगातल्या बिया, झाडांच्या साली वगैरे खातात. पोषक द्रव्यांबरोबर विषारी द्रव्येही त्यांच्या पोटात जातात. ती पचवण्यासाठी ते त्यांच्याबरोबरच मातीही खातात म्हणे! अचानकपणे त्या पक्षांचा मूड बदलला व भूर्रर्र करून सगळा थवा उडून गेला. आम्हीही पुढच्या वळणावर पोहोचलो. तिथे राखाडी मान असलेले, तपकिरी डोळयांचे, केशरी पंखांना काळी झालर असणारे, डोक्यावर टोकदार तपकिरी तुरे अस्णारे हॉटझीन जातीचे पक्षी आमची वाटच पहात होते. हे पक्षी झाडांच्या खोडाच्या रंगाशी बरेचसे साम्य असणारे असल्याने दूरून लक्षात येत नाहीत. हे ही दिसतात छान पण त्याचा वास मात्र खूपच घाण आहे. पूर्ण शाकाहारी असूनही त्यांच्या चयापचय क्रियेतून बाहेर पडणाऱ्या वायूचा तो वास असतो. याशिवाय काळे कॅमनस, हमिंग बर्डस तर किती पाहिले याची गणतीच नाही.

तळ्याच्या पाण्यात मासेही भरपूर होते. दोन तास तरी आम्ही कधी झाडांच्या कमानी खालून तर कधी छोट्याश्या बोगद्यातून नावेतून फिरत होतो. खूप आनंद देणारा अनुभव मनात साठवून आम्ही परत आमच्या खोलीत आलो.

रात्री परत एकदा नदीतून रात्रीचे प्राणी शोधण्याची मोहिम झाली. पांढरे घुबड पहायला मिळाले. ज्याच्या नुसत्या स्पर्शानेही समोरचा प्राणी मरेल इतका विषारी बेडूकही बघायला मिळाला. परत पुन्हा अगुती वगैरे मंडळींची गाठभेट झाली. आता तिथला परिसर परिचयाचा झाला होता. त्यामुळे रात्रीच्या चांदण्यात नदीपर्यंत फेरफटकाही मारून झाला.

सकाळी उठल्यावर पहिले काम दोन दिवस आमच्या पायाशी जुळवून घेणारे गमबूट परत करणे हे होते. आपल्याला एकादी गोष्ट उपयोगी पडते तोवरच ती हवी असते. गमबूटांचेही तसेच. चिखलाने माखलेले आमचे गमबूट हातात धरून कसे काय ऑफिसपर्यंत न्यायचे असा प्रश्न साहजिकच डोक्यात आला. पण सकाळी चहाच्या वेळी जमलो तेंव्हा बूट फक्त खोलीच्या बाहेर ठेवायचेत असे कळले व हायसे वाटले. तोच दुसरा प्रश्न मनात आला की इतके सारे बूट आता परत स्वच्छ कसे करणार? आम्हाला आमची उत्सुकता स्वस्थ बसू देईना.

आम्ही आमचे बूट घेऊन जाणाऱ्या सेवका मागोमाग गेलोच.

एका तिरक्या सळईत बूट अडकवून त्यावर जोराचा पाण्याचा व हवेचा फवारा मारण्याची सोय पाहिली. पाच मिनिटात बूट काळेशार व नवीन पाहुण्यांच्या स्वागतासाठी सज्ज! सकाळीच आम्ही आमचा मुक्काम हलवून कुझकोला परत जाणार होतो. इथे येताना यावेसे मनापासून वाटत नव्हते तसेच जातानाही जावेसे वाटत नव्हते. तिथल्या सर्व सेवकांना व आमच्या गाईडबाईंना धन्यवाद देऊन आम्ही परतीच्या मार्गाकडे वळलो.

परत तांबोपाटा नदीतला परतीचा प्रवास सुरू झाला तरी नजर मात्र परत परत‘ इंकाटेरा ’लॉजकडे वळत होती. एखाद्या ठिकाणी जाऊन एक सुद्धा वस्तूची खरेदी झाली नाही अशी ही पहिलीच वेळ असावी. दरवेळी खरेदीमुळे बॅगा जड होतात. यावेळी मन जड झालं होतं! कशाने ते सांगू? आयुष्यात कल्पनेतही न आलेलं साहस, जंगलातले वास्तव्य, अगुतींचा सहवास, शंभर फूट उंचीवरून डोंबाऱ्यासारखे झुलत्या पुलावरून चालणे, अद्भुत किमया दाखवणारी झाडे, विविध पक्षी... यातलं सगळं सगळं मनात भरून राहिलं होतं म्हणून. काही म्हणता काहीही विसरणे शक्य नाही.

*(पुर्वप्रसिद्धी: ‘मेनका जुलै २०१६’)*

## सफारी इन माबुला

मी जात्याच भित्री असल्याने दक्षिण आफ्रिकेला जायचे टाळत होते. पण पूर्वी एका स्नेह्यांकडून ऐकलेले आफ्रिकन सफारीचे वर्णन मोहही पाडत होते. भलं मोठ्ठं शिवार, उंच उंच गवत, मुक्त जंगली प्राणी आणि आपण मात्र उघड्या मोकळ्या जीपमध्ये ही कल्पना जरी रम्य असली तरी मला फारशी आकर्षक वाटत नव्हती. ह्यांना मात्र मनापासून तेथे जायचे होते, म्हणून आम्ही जोहान्सबर्ग व केपटाऊन हा भाग “बिग फाईव” बघण्यासाठी निवडला.





जोहान्सबर्ग जरी आमच्या सहलीतले पहिले ठिकाण होते तरी तेथे न रहाता जवळच्याच ’सनसिटी’मध्ये रहाणे सगळे पसंत करतात. त्याप्रमाणे शहरात फिरून आम्हीही तेथेच गेलो. सनसिटीचे वर्णन मिस वर्ल्ड, मिस युनिव्हर्स स्पर्धांमुळे ऐकले होते. क्वचित टीव्हीवर पाहिलेही होते. पण प्रत्यक्षात ’हॉटेल निसर्ग सान्निध्यात होते’ एवढे सोडल्यास विशेष वेगळे काही वाटले नाही. हॉटेल्स छान होती, ’बिग ५’ चं आस्तित्व तिथल्या सजावटीत ठायी ठायी दिसत होतं. छोटे छोटे खरे व कृत्रिम धबधबे, जंगलातली पायवाट, (कृत्रिम) लाटा उसळणारी तळी, कारंजी यांची शोभा हत्ती, सिंहांच्या पुतळ्यांनी अधिकच वाढवली होती. ठराविक वेळी हत्तींच्या पाठीमागून धूर सोडला जायचा, हत्तींचे चीत्कार, सिंहाच्या डरकाळया व माकडांचे ओरडणे ऐकू यायचे. मजा वाटली.







सनसिटी मध्ये कॅसिनो असणे आवश्यकच. किंबहुना कुणी कॅसिनोमध्ये खेळायला व बिग फाइव पाहायला तर कुणी वीकएंड साजरा करायला तिथे येतात.

त्यामुळे आम्हालाही खेळण्याची नाही तरी तिथली गंमत पहाण्याची उत्सुकता होतीच. जुगाराच्या अड्ड्यामध्ये जायला मन धजावत नव्हतं.



त्याचवेळी आतला एकंदर कोलाहल, हसण्याचे आवाज बाहेर थांबूही देत नव्हते.



कॅसिनोच्या जवळ गेलो तर बाहेरच दरवाजापाशी (खोट्या) नाण्यांची रास एका सोनेरी घड्यातून खाली जमिनीवर ओतली जाते आहे असे दृश्य होते आणि त्यावर प्रकाशाचा झोत असा काही कोन साधून पडत होता की ती रास खरीच वाटावी. आपली लक्ष्मीची मूर्तीच काय ती कमी होती. दिव्यांची रोषणाई, आजुबाजूची बाग, आत बाहेर करणाऱ्या लोकांची लगबग, आणि एकंदर वातावरणातील उत्साह आम्हालाही खेचून आत घेऊन गेला. इथे आमचे पासपोर्ट आम्ही उतरलेल्या हॉटेलच्या ताब्यात असल्याने मलेशियासारखी त्याची तपासणी नव्हती. फक्त दारावर आमचा खोली नंबर विचारला. आत पाऊल टाकताच सिगारेट, सेंट, व दारूचा एकच संमिश्र वास नाकात घुसला. विविध रंगसंगतीचे कपडे ल्यालेली विविध देशातली माणसे भान हरपून खेळण्यात मग्न होती.

प्रशस्त जागेत भरपूर खेळण्याची यंत्रे असलेले कॅसिनो वातानुकूलित, रंगीबेरंगी दिव्यांच्या प्रकाशझोतांनी नुसते झगमगत होते॰ प्रत्येक यंत्रात माणसे आपापली नाणी- खोटे शिक्के सारून, खटके ओढून आपापले नशीब आजमावून बघत होती. त्या यंत्रातून कधी नाणी पडलीच तर वेड्यासारखी ओरडत होती, नाचत होती, एकमेकांना मिठया मारत होती... अगदी जल्लोषाचे वातावरण होते सगळीकडे. कुठे खटके दाबायची यंत्रे होती तर कुठे भली मोठी चक्रे एका छोट्या गोळ्याला गरागरा फिरवत होती, कुठे पत्त्यांचे सराईत हातातून वाटप चाललेले होते. पत्ते वाटणाऱ्या हातांची सफाई अवर्णनीय होती. आकर्षक गणवेशातील कर्मचारी, त्यांचे पत्ते हाताळताना होणारी हातांची सराईत हलचाल, रंगवलेली नखे आणि सुबक हात अगदी नजर खिळवून ठेवत होते. सगळीकडे लक्ष्मीचा खळखळाट ऐकू येत होता. आपल्याला जरी हे सगळे बघायचा कंटाळा आला तरी खेळणारे मात्र अगदी तल्लीनतेने खेळत होते. खाणेपिणे, सिगरेट, वारुणीचे घुटके - सगळे तिथेच, त्या यंत्र देवासमोर बसूनच.

आमच्यासारख्या बघ्यालाही आपल्या जाळयात ओढण्यासाठी काही शिक्के फुकट देण्याचे प्रलोभन कॅसिनोचे कर्मचारी सतत दाखवत होते. आपण ते घेऊन जर एखाद्या खेळाकडे म्हणजे आपल्याला खेळायला सोप्या अशा खटक्याच्या खेळाकडे गेलो आणि थोड्या वेळातच कंटाळून निघालो तर त्या यंत्राकडे इतर मंडळी अगदी धावत सुटायची. प्रथम असे का ते कळलेच नाही. मग समजले की, आपल्यासारख्या बिगिनरचे नशीब त्या लोकांना लाभते म्हणे! सगळे वातावरण जरी खूप आकर्षक असले तरी सिगारेटचा व दारूचा वास आम्हाला फारवेळ तिथे थांबू देईना. मोकळया हवेत आल्यावर बरे वाटले.

कॅसिनोची सजावट आतून होती तशीच बाहेरूनही खूप कलात्मक होती. प्रत्येक कॅसिनोबाहेर छान बाग होती. शोभेची झाडे, फुलझाडे यांची रंगसंगती अगदी नजर खिळवून ठेवत होती. दिव्यांच्या खांबावर वेलींचे झोपाळे करून त्यावर विविध पक्षी बसवले होते. छान संगीत होते. झाडांवर माकडे उड्या मारत होती. कोणी खाऊ दिला तर पटकन उतरून परत जात होती. निसर्गाच्या प्रसन्न सान्निध्यात प्रवासी खाद्य पेयांचा आस्वाद घेत होते. सगळे पहाता पहाता दोन दिवस कसे गेले कळले सुद्धा नाही.



आपल्या जगतसुंदऱ्या जिथे उतरल्या होत्या त्या ठिकाणी आम्ही जाऊन आलो, राहिलो याचा आनंद होताच पण आता पुढचे वेध लागले होते ते सोन्याच्या खाणीचे आणि माबुला लॉजचे. त्यासाठी परत मुक्काम जोहान्सबर्ग!

आलो त्या दिवशी जो'बर्गचा काही भाग पाहिला होता. उरलेला सनसिटीहून माबुलाकडे जाताना. वाटेमध्ये सोन्याची खाण! अपेक्षेप्रमाणे ती गावापासून दूर होती, पण निर्जन भागात नव्हती. एक दोन मस्त रेस्टॉरंट्स, शेजारीच मुलांसाठी करमणूक केंद्र, रोलर कोस्टर, रिझॉर्ट्स यांनी ही 'गोल्ड रीफ सिटी' गजबजली होती. अर्थातच सर्वांचा केंद्रबिंदू म्हणजे गोल्ड माईन. सोन्याचे आकर्षण आम्हा भारतीयांइतकेच परदेशीयांनाही वाटते. त्यामुळे लहान मुलांच्या खेळण्यांमध्ये न रमता मंडळी सोन्याच्या खाणीकडे वळली.

खाणीत प्रवेश करण्याचा रस्ता सुव्हेनीर शॉपमधून होता. गोल्डरीफचा ट्रेडमार्क असणाऱ्या तबकड्या, टी शर्टस, की चेन्स अशा अगणित वस्तू विक्रीसाठी मांडून ठेवलेल्या होत्या. त्यातील १-२ गोष्टी खरेदीकरून वळलो. एका भल्यामोठ्या लोखंडी कमानीने आमचे स्वागत केले. सोन्याच्या खाणीचे प्रवेश द्वार लोखंडाचे आहे याची गंमत वाटली. मी तर अशाप्रकारची खाण प्रथमच पहात होते. त्यामुळे सगळ्याच गोष्टींचे मला कुतूहल वाटत होते. माईन बघायची असेल तर फक्त गाइडेड टूरच घेता येते. स्थानिक गाईडने आत कोणती काळजी घेणे आवश्यक आहे ते सांगितल्यावर गंमत-जंमत करणारी मंडळी जरा गंभीर झाली. अन जेव्हां आम्ही हेल्मेट घालून व हातात टॉर्च घेऊन पिंजरावजा लिफ्टमध्ये शिरलो तेव्हा लिफ्टची एकंदर अवस्था पाहून हे गांभीर्य अधिकच वाढले. आपण जमिनीखाली २२० ते २५० मीटर जाणार आहोत हे कळल्यावर तर बोलतीच बंद झाली.



थोडेसे खाली जातोय तोच लिफ्टच्या बाहेरच्या बाजूने प्रथम पाणी ठिबकण्याचा व नंतर भिंतीवरून पाणी ओघळण्याचा आवाज यायला लागला. क्वचित तुषारही अंगावर उडले, कानांत दडे बसले, अंधार वाढायला लागला. मिणमिणत्या उजेडात लिफ्ट जास्तच जुनाट वाटत होती. तिचा वाढत जाणारा आवाज अंगावर काटा आणत होता. कधी बाहेर पडतोय असे झाले होते. तोच मोठा आवाज करून, एक लहानसा गचका देत लिफ्ट थांबली. 'चला, सुटलो!' म्हणत लिफ्ट मधून बाहेर पडलो ते काळोखी भुयारात! भुयार पाहिल्यावर तर अगोदरची लिफ्टच बरी वाटायला लागली. भुयार मिणमिणत्या उजेडाचे, जेमतेम ७-८ फूट उंची असलेले व एकावेळी २-३ माणसे जाऊ शकतील असे होते. पायाखालची जमीन टणक व खूपच खडबडीत असल्याचे बुटांच्या तळव्यातूनही पायाला जाणवत होते.

त्या खडबडीत भुयारातून आम्ही जमिनीखाली २५० मीटरवर चालत होतो ही कल्पनाही फारशी आकर्षक नव्हती. तसेही उष्णता आणि ताज्या हवेच्या अभावामुळे आपल्याला इथे २० मिनिटांपेक्षा जास्त थांबू देत नाहीतच. जरी हवेचा दाब व प्रवाह नियंत्रित केले असले तरी आर्द्रतेमुळे फार वेळ थांबणे त्रासदायकच होते. या परिस्थितीत राहून सोने काय किंवा कोळसा काय खणून काढणाऱ्यांना माझे शतशः प्रणाम! या भुयारात ठिकठिकाणी वेगवेगळी हत्यारे, डायनामाईट्स, विजेचे जनरेटर सेट्स, खाणीतून निघणारे दगड वाहून नेण्यासाठी जिने, रस्ते, गाड्या ठेवलेले होते. काही ठिकाणी पुतळे तर काही प्रात्यक्षिके दाखविण्यासाठी कामगारही होते. कधी मिणमिणत्या उजेडात तर कधी टॉर्चच्या प्रकाशात आम्ही हे सारे पहात होतो. डोळे सरावले अन आपण जमिनीखाली आहोत हेच विसरायला झाले.



सगळेजण बघण्यात एवढे रमलो की गाईडने “आता परत फिरूया” म्हटल्यावर “एवढ्यातच?” अशीच सगळ्यांची प्रतिक्रिया झाली. पण शेवटी लिफ्टपाशी जेव्हा “ही खाण मुळात १००० मीटर खोल होती, पण आता ३०० मीटरच्या खाली पाणी भरलेले असल्याने बंद आहे” असे कळले तेव्हा उगीचच पायाखालची जमीन हलते आहे असा भास होऊन कधी वर उघड्यावर जातो असे झाले. परत त्या लिफ्टचा प्रवास सुरू झाला. लिफ्ट वर येताना जास्तच आवाज करते व तिच्या वेगाने भींतीवरून ओघळणारे पाणी जास्त जोरात आम्हाला भिजवते आहे हेही अनुभवायला मिळाले.

वर येऊन मोकळा श्वास घेतल्यावर खूप बरे वाटले. शुद्ध हवेची महती अशा वेळी प्रकर्षाने जाणवते. खाणीतून मिळणारं सोनं, दगड, वाळू व इतर धातूंपासून वेगळं करून शुद्ध करतात. वितळवून त्यापासून ठोकळे तसेच चिपा बनवण्यापर्यंत काय काय प्रक्रिया केल्या जातात याचे प्रात्यक्षिक शेजारच्याच खोलीत चालू होते. १० किलो सोन्याची ढेप खास हात लावण्यासाठी ठेवली होती. सर्वजण त्याला कुरवाळत होते हे पाहून माझाही धीर चेपला व मग मीही माझे हात पावन करून घेतले. १-२ ग्रॅम पासून फारतर १० ग्रॅम पर्यत सोने हातात घेणारे माझे हातच त्यादिवशी सोन्याचे झाले.



सोने पाहून झाल्यावर आमच्या गाड्या मुख्य मुक्कामाकडे निघाल्या. गेम सफारीबद्दलची माझी कल्पना म्हणजे जंगल, त्यातले प्राणी आणि त्यांना बघण्यासाठी तुफान वेगाने धावणारी जीप. म्हणून या मुक्कामासाठी मी नाखूष होते. जो'बर्गपासून सुमारे अडीच तासाचा प्रवास. वाटेत कुठे वस्ती तर कुठे डोंगर, मोकळी जागा. वाटेत दूरवर काही खाणीही दिसू लागल्या. त्या खाणीतून बाहेर टाकलेल्या मातीचे, दगडांचे ढीग उन्हात चमकत होते. पण जंगलाचे अन प्राण्यांचे नाव नव्हते. शेवटच्या अर्ध्या तासात चित्र एकदम बदलले. रस्त्याच्या कडेने झाडे दिसायला लागली, लांब दिसणारे डोंगर जवळ आले, वळणे वळणे घेत आम्ही 'माबुला लॉज' मुक्कामी पोहचलो.

आमची गाडी तिथे पोहोचताच आदिवासी वेषातल्या एका माणसाने जोरजोरात ढोल वाजवायला सुरुवात केली. प्रवेशालाच कमान व मागे मोकळे अंगण होते. आम्हाला ‘सुस्वागतम्’ म्हणायला आदिवासी वेषातील कर्मचारी हजर होते. ओले टॉवेल व सरबताचे ग्लास हातात देऊन कमरेत वाकून् त्यांनी सर्वांचे स्वागत केले. त्या गरम व चिकचिक्या हवेत ओले टॉवेल व कोमट पण टेस्टी सरबत खूपच छान वाटले. आत्तापर्यंतच्या प्रवासाचा थकवा कुठेच्या कुठे पळून गेला. रिसेप्शन हॉलमध्ये सर्व आधुनिक सोयी असल्या तरी सजावट मात्र जंगलातल्या वातावरणाला साजेशी होती. समोरच छोटसं तळं त्यावर सुबक पूल, मागे सर्वत्र झाडे व निवासी खोल्यांचे पुंजके.







वॉटरबर्ग डोंगराच्या परिसरात लिम्पोपो प्रॉविन्समध्ये १२, ००० हेक्टर आवारात हे लॉज आहे. अनेक छोट्या छोट्या झोपड्या व ३-४ कॉन्फरन्स हॉल असणारे हे लॉज निसर्गाशी पूर्ण एकरूप झालेले आहे. बऱ्याचशा खोल्या एकमजली, क्वचित एखादी इमारत दुमजली. खोल्या गटागटांत विभागलेल्या पण एकमेकांपासून दूर दूर आहेत. मधे मधे पायवाट, मोठी मोठी झाडे व गुडघ्याइतके गवत होते. दिवे अगदी मंद होते. झाडांवर दिवसा वेगवेगळे पक्षी तर रात्री वटवाघळे दिसली. दिवसभर वेगेवेगळया आवाजात वेगवेगळे राग आळवत असलेल्या पक्षांना रात्री रातकिड्यांनी छान 'किर्रर्र' संगीताची साथ दिली होती.

आमची खोली रिसेप्शन हॉलपासून दूर, सगळयात शेवटच्या एका दुमजली इमारतीच्या तळमजल्यावर एका टोकाला होती. आम्ही दोघे सोडल्यास इतर कोणीच त्या इमारतीत वस्तीला नव्हते हे लक्षात आल्यावर व आजुबाजूचे उंच उंच गवत पाहून मलातर पळून जावेसे वाटत होते. पण जाणार कुठे? शेवटी जीव मुठीत धरून २ दिवस काढणे भाग होते. खोलीत आधुनिक सोयी तशा मर्यादितच होत्या. दारासमोरच्या भिंतीवरला भला मोठा पडदा 'मागे काहीतरी आहे' हे दर्शवीत होता. तो उघडताच एक मोकळा व्हरांडा "वनराईची शोभा बघायला या" म्हणून बोलावीत होता. व्हरांड्याला कठडा वगैरे नव्हताच पक्त गवतात शिरणाऱ्या ३-४ पायऱ्या होत्या. अंधार पडेपर्यंत मजा वाटली, पण नंतर मात्र बिग ५ पैकी कोण येईल सोबतीला याची भीती वाटू लागली. जेवणाची वेळ झाल्याची बातमी हवेत दरवळणाऱ्या मसाल्यांच्या वासाने व रिकाम्या पोटाने करून दिली तसा आम्ही आमचा मोर्चा जेवणघराकडे वळवला.





आल्या आल्याच सुग्रास पंगतीचा बेत होता – खास ’बिग ५’ च्या देखरेखीखाली! जेवणगृहाच्या भिंतींवरून ते पाहुण्यांकडे लक्ष ठेऊन होते. सजावट विविध प्राण्यांची मुंडकी, कातडी, शिंगे वापरून केलेली होती, उजेडही आवश्यकते इतकाच. आफ्रिकन पदार्थ जेवणात होतेच पण इतरही चविष्ट पदार्थांची रेलचेल होती. पदार्थांच्या चवी थोड्याश्या परिचित वाटत होत्या म्हणून चौकशी केली तर मुख्य आचारी भारतीय असल्याचे समजले. नुसत्या वासानेच ’घरेलू’ वाटले. हॉटेलचे कर्मचारी प्रत्येक ठिकाणी हसून प्रेमाने स्वागत करत होते. निग्रो नेहमी उग्र चेहेऱ्याचे असतात ही माझी कल्पना एका क्षणात विरून गेली.



इथपर्यंत सगळे कसे मस्त होते. पण "पहिली तीन तासांची सहल संध्याकाळी आहे, खोलीत जाऊन थोडावेळ विश्रांती घेऊन सफारीसाठी तयार रहा" असा गाईडचा आदेश ऐकताच माझ्या पोटात गोळाच आला. जेवण अंगावर आले होते त्यामुळे पाय आपोआप खोलीकडे वळले. सफरीला जायची भीती जास्त का खोलीत एकटीने बसायची भीती जास्त हेच समजत नव्हते. शेवटी बाहेर जाऊन पहाणेच पसंत केले. १०-१२ जीपचा तांडा लॉज समोर उभा होता। ५-७ फूट उंचीच्या, ६ ते ८ चाकांच्या, हिरवट रंगाच्या, ९ जणांच्या बसण्याची व्यवस्था असणाऱ्या उघड्या टपाच्या जीपकडे पाहूनच जीव दडपला.

वर चढून बसायचा कस हा प्रश्न फक्त माझ्या मनात आला नाही, तर सगळेच या विचारात दिसले. या जीपमध्ये ९ प्रवासी तीन चढत्या बाकांवर बसतात त्यामुळे कोणत्याही सीटवरून सगळीकडचे दृश्य स्पष्ट दिसते. त्यांचे चालक असे धिप्पाड की, क्षणभर त्यांचीच भीती वाटावी. रंगाने काळेकभिन्न, उंची ६ फुटांपेक्षा जास्त, मजबूत बांधा असणारे असे असले तरी पण त्यांचे विनम्र बोलणे, हसणे, मदतीचा हात पुढे करणे सारेच प्रसन्न करणारे होते. सगळ्यांनाच जीपमध्ये चढायला चालकाची मदत लागली. आमच्या जीपमध्ये आम्ही फक्त ६ जणच होतो. कसे चढायचे, कुठे पाय ठेवला तर चढणे सोईचे होईल याचा विचार माझ्या मनात चालू असताना जीपच्या चालकाने मला जीप मधल्या सगळ्यात उंच बाकावर कधी टाकले तेच कळले नाही. जीपमध्ये सगळे बसल्यावर एका रेंजरने प्रत्येक चालकाजवळ एक एक बंदूक व तीन तीन गोळ्या दिल्यावर त्याची नोंद केली. एकंदर रागरंग पाहता मला खोलीत परत पळून जावे असे फार वाटू लागले. तेवढ्यात जीपचा तांडा चालू लागला.

लॉजच्या आवारातून बाहेर पडताच पुरुषभर उंचीचे पिवळे पिवळे गवत सगळीकडे दिसू लागले. थोड्या अंतरापर्यंत एकत्र राहून मग प्रत्येक चालकाने आपला वेगळा मार्ग स्वीकारला. भोवती सर्वत्र गवत व आपण त्यात एकटे ह्या भीतीने काळजाचा ठोकाच चुकला. चालक मात्र त्याच्या ठरलेल्या गतीने पुढे गवतातल्या रस्त्यात जीप दामटवत होता. भन्नाट वारा सुटला होता, वाऱ्यावर डुलणाऱ्या गवताच्याही वरून लांबवरचे दृश्य पहाताना भीतीची जागा उत्सुकतेने व प्रसन्नतेने कधी घेतली कळलेच नाही.





समोर लाल मातीचा कच्चा रस्ता, व आजूबाजूला नजरेच्या टप्प्यापर्यंत फक्त रानच रानच दिसत होते. गवत व झाडे याखेरीज दुसरं काही नव्हतंच. चालक तर मातीच्या खडबडीत रस्त्यांवरून वेगात गाडी हाणत होता, पटकन उजवी डावी वळणे घेत होता. १२००० हेक्टरचे रान, त्यात मातीचे रस्ते. ना कुठे चिन्हे, पाट्या वा खुणा. आपण चुकणार तर नाहीना अशी पाल चालक सोडून बाकी प्रत्येकाच्या मनात चुकचुकली. आपापसात तशी कुजबूजही सुरू झाली, आपोआपच शेजारच्या सीटवरच्या सोबत्याचे हात घट्ट धरले गेले. त्यात अचानक गाडी थांबली. समोर पाहिले तर दूरवर दोन गेंडे उभे होते. इथे गवत थोडे कमी उंच होते त्यामुळे लगेच आम्ही फोटो काढणे सुरू केले. उदी रंगाचे ४-५ फूट उंचीचे २ गेंडे आम्हाला पाहायला आमच्याच दिशेने यायला लागले. त्यांचा आकार व आविर्भाव बघण्यासारखा होता. आमच्या जीपपासून ५-६ फूटांवर थांबून त्यांनी आमचे निरीक्षण सुरू केले. रानातले ते रहिवासी व आम्ही पाहुणे. आमचे नीट निरीक्षण करून ‘अत्यंत निरुपद्रवी’ असल्याचा शिक्का त्यांनी पायाखालची जमीन जोरजोरात उकरून उमटवला व तोंडाने ‘फुर्रर’ करून ते आमच्या समोरून दुसऱ्या बाजूला निघून गेले. ते रस्ता ओलांडून जाईपर्यंत आमचा मुक्काम तेथेच.



रानाच्या सुरुवातीसच ते दोघे भेटल्याने त्यांची नेमणूक या रानाचे पहारेकरी म्हणून असावी यावर आम्हा सर्वांचे एकमत झाले. गेंडे पूर्णपणे नजरेआड होईपर्यंत आम्ही एकटक बघत होतो. सुरवात तर छान झाली म्हणून आम्ही खूश! जीप पुढे निघाली.

थोडे पुढे जातो तो हरिणांचे व झेब्र्यांचे कळप मुबलक प्रमाणात भेटले. त्यांचे भरपूर फोटो काढून आम्ही पुढे निघालो. वाटेत बबून, जिराफ, नीलगाई वगैरे मंडळी भेटतच होती. पण अजून हत्ती व जंगलचा राजा दिसले नव्हते.

"आता सायंकाळी पाणवठ्यावर सिंह दिसतील, कदाचित लेपर्डही दिसण्याची शक्यता आहे" असे चालक महाशय सांगत होते तोच खर्र खट्ट असा आवाज करून जीप थांबली.

आम्हाला वाटले हत्तीबित्ती आला की काय?आमचे कॅमेरे सरसावले जाणार तोच “गाडी पंचर हाय, टायर बदलायला हवा, तवा समदे खाली या” अशी आज्ञा ऐकू आली. सहज सभोवती नजर टाकली तर हाकेच्या अंतरावर हरणं, नीलगाई, झेब्रे व दूरवर गेंडे दिसत होते. जवळच कुठेतरी गजराज व वनराजही असणार होते. हे सगळे मनात आले, अन खाली उतरायचे कुणाचेच धाडस होईना. संध्याकाळ झपाट्याने पसरत होती, अंधाराची शाल कधीही पुढे सरकणार होती. आसपास दुसरी जीप दिसत नव्हती, लॉज तिकडे दूर कुठेतरी राहिलेले. भोवताली फक्त रानगवत, प्राणी अन टायर फुटलेली जीप. बापरे! ’नाटककाराच्या शोधात सहा पात्रे’च्या चालीवर ’श्वापदांच्या शोधात सहा प्रवासी’ ऐवजी “सहा प्रवाशांच्या शोधात श्वापदे”असे नवीन नाटक जंगलाच्या पार्श्वभूमीवर रंगणार की काय याची भीती वाटायला लागली.

माझी तर पाचावर धारण बसली. “बघा, मी म्हणत नव्हते का की… ” ह्या माझ्या बडबडीकडे लक्ष द्यायला कुणालाच वेळ नव्हता कारण चालकाची “खाली उतरा व दूर गवतात उभे रहा” अशी घाई चाललीच होती. शेवटी जीव मुठीत धरून सर्वजण उतरले. आता झेब्रे व हरणांची सोबतही खूपच हवीहवीशी वाटू लागली. आम्हाला धीर देण्याच्या उद्देशाने तेही आमच्या जवळ येऊ लागले. त्यांचे फोटो काढण्यात आम्ही रंगून गेलो त्यामुळे खाली उतरताना वाटलेली भीती कशी व केव्हा कमी झाली ते कळलेच नाही. आजूबाजूला बघण्यासारखे तर खूपच होते. इतकावेळ जीपमधून एकसारख्या दिसणाऱ्या गवताच्याही खूप जाती आहेत, त्यावर छोटीछोटी नाजूकशी विविधरंगी फुलेही आहेत हे समजले.

मोठ्य़ा झाडांच्या शेंड्यांवरून गुलाबी, पांढरट दिसणारे फुलांचे झुबके मन आकर्षीत करत होते. हे सगळे भरधाव जाणाऱ्या जीपमधून दिसलेच नव्हते. आमचे निरिक्षण चालू होते तोवर जीपमधल्या दोन्ही पुरुष प्रवाश्यांच्या मदतीने चालकाने अर्ध्या तासात जीप ठीकठाक केली. जीपचे बदललेले भले मोठे चाक त्याने एकट्याने हाताने उचलून जीप मध्ये आदळताच जीप जागेवरच थरथरली. जीपला उचलण्यासाठी लावलेला जॅक जीप इतकाच भक्कम होता. तो लावताना त्याचा आकार बघण्याचे कुणालाच सुचले नव्हते तर आता उतरवताना तरी बघू या म्हणून आम्ही जीपजवळ गर्दी केली. ते पहाताच चालकाने परत ओरडून "जीपपासून १०-१२ फूट लांब जा" असे ओरडून सांगितले. आम्ही दूर जाताच त्याने जीपला जॅक लावलेला असतानाच जीप जोरात चालू केली, व इतकावेळ उभ्या स्थितीत असणारा जॅक धाडकन मातीत आपटला, खूपच धूळ उडाली, मोठा आवाज झाला जीप पुढे गेली. चालकाने ती परत आमच्या जवळ आणली, जीपमध्ये चढण्याची खटपट झाली जॅक लावण्याच्या पद्धतीची व जॅकच्या नवीन प्रकाराची आमच्या द्न्यानात भर पडली व आम्ही पुढे निघालो.



थोड्याच अंतरावर आमची वाट बघत उभे असलेले गजराज भेटले, अगदी दहा फुटावरून दर्शन झाले. नशीब, ते थोडे उशीराने संध्याकाळच्या फेरफटक्यासाठी निघाले होते नाही तर आमची गाठभेट अगदी जवळूनच झाली असती. जीपवर चढल्याने आम्ही आता थोडेतरी त्यांच्या लेव्हलला आलो होतो. आफ्रिकन हत्ती किती मोठा असतो ते आत्तापर्यंत फक्त पुस्तकात वाचले होते. पण इथे समोर आपले प्रशस्त कान हलवत, लांबलचक सोंडेने गवत तोडून डोक्यावर मारत आपल्या बारीक डोळयांनी आम्हाला ते बराच वेळ न्याहाळत होते. पुरेसा वेळ फोटो काढायला देऊन सावकाशपणे गजराज हलले. जरी ते आमच्यापासून दहा फुटांवर होते, आम्ही जीपमध्ये होतो तरी गजराज दिसेनासे होईतो जीव थोडा धाकधूकच करत होता.

पुढे गेल्यावर पाणवठ्यावर सुसर, हिप्पो दिसले, वनराज मात्र थोडक्यात हुकले. इतरांना कदाचित हळहळ वाटली असेल, पण मला मात्र चालकाची खटपट, त्याची ताकद, कुठलेही संकट न येताच आलेली मानसिक धास्ती, झेब्रे, हरणे, गेंडे इत्यादींचा अवतीभवतीचा वावर हे वेगळे पण अद्वितीय अनुभवच संपूर्ण सहलीचे फळ देऊन गेले. बघता बघता रान अंधारात गडप झाले व आमची जीप परत वळली. बिग ५ पैकी तिघे तर भेटले. आता पोटात कावळे कोकलत होते, तरी रानावरून नजर हटत नव्हती. सभोवतीचा अंधार, आकाशात रेंगाळणारा चुकार संधिप्रकाश, त्यात उजळून निघालेले ढग, चंद्राची कोर, दूरवरचे धूसर डोंगर सारे सारे खूपच रम्य दिसत होते.


लॉजवर परतलो तर आफ्रिकन वाईन (आणि सरबताचेही) ग्लास स्वागताला तयार! सकाळच्या तालवाद्याऐवजी खास आफ्रिकन तंतूवाद्य वाजत होते. खांबाखांबांवर मशाली तेवत होत्या. त्यांचा उजेड व धुराचा वास आपण शहरापासून दूर जंगलात आहोत याची जाणीव करून देत होते. चविष्ट खाद्यपदार्थांची रेलचेल असलेला बूफे उघड्यावर मांडला होता. खमंग वासानेच पोट भरून गेलेसे वाटले. बटाट्याची भाजी, वांग्याचे खरपूस भरीत, वेगवेगळ्या उसळी, सलाडचे प्रकार... एवढे सगळे पदार्थ आहेत, तर त्याबरोबर पोळी किंवा भाकरी मिळेल तर किती मजा येईल असे मनात येईतो मागून प्रश्न आला, “हॅल्लो सर, लाइक टु हॅव रोटी?”. उत्स्फूर्तपणे “ वॉव “ असा प्रतिसाद आला आणि उरलेले पोटही भरून गेले. ओळीत मांडलेली टेबले, मधे मधे छोट्या छोट्या फायर-प्लेसेस, वाद्यवृंद, झोपड्या... अगदी मस्त माहोल होता. थोडी चौकशी केली तर दुपारच्या जेवणाच्यावेळी थोडक्यात चुकामुक झालेले बल्लवाचार्य भेटले. ते चक्क मुंबापुरीचे पूर्वरहिवासी निघाले. ते आणि आम्ही अगदी एका गावचेच की! मग तर रोटी जास्तच गोड लागली॰सगळे पदार्थ नुसते चाखून पाहिले तरी पोट तुडुंब भरले, निद्रादेवी खुणावू लागली व पाय आपोआपच खोलीच्या दिशेने पडू लागले.

खोलीत पंखा होता पण हवेतला गरमा कमी करण्यएवढी ताकद त्याच्यात नव्हती. पलंग, गाद्या, उश्या सगळे छन होते पण थोडीशी डासांची गुणगुण बेचैन करत होती. दिवे नव्हतेच त्यामुळे भींतीवर हलणाऱ्या आमच्याच सावल्या खूप मोठ्या वाटत होत्या. कसेबसे कंदिलाच्या प्रकाशात झोपायचा प्रयत्न करत होतो तोच खोलीमागच्या व्हरांड्यात खुसफूस एकू आली. हळूच पडदा बाजूला करून पाहिले तर एक हरीण आपल्या कुटुंबासह आमच्या खोलीपाशी मुक्कामाला आला होता. आपण कुठेही गेलो आणि कुणी आपल्याला भेटायला आले तर किती छान वाटते ना! तसेच एका हरिणाने सहकुटुंब भेट देऊन आमचे क्षेमकुशल विचारण्याचे सौजन्य दाखवले हे खूप म्हणजे खूपच छान वाटले आणि लगेच मस्त झोपही लागली एवढे मात्र खरे!

दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वा. दुसरा फेरफटका होता. परत जीपची सफर. पण आज मात्र भीती अजिबात वाटत नव्हती. उलट कधी एकदा जीप सुरू होते व आपण रानात शिरतो याची उत्सुकता होती. पहाटेचा मस्त गारवा, चमकते दंवबिंदू, अगदी नजरेसमोर झालेला सूर्योदय बघताबघता आम्ही रानात प्रवेश कधी केला कळलेच नाही. काल रात्रीचे रान ते हेच का असा प्रश्न पडावा एवढे सगळे सकाळच्या वेळी वेगळे दिसत होते. सकाळच्या – पहाटेच्या – कोवळ्या उन्हात सगळे गवत कसे सोन्यासारखे लखलखत होते. झाडे ताजीतवानी होऊन वाऱ्यावर डोलत होती. त्यावर त-हेत-हेचे पक्षी इकडून तिकडे आपले पंख फडफडवत घिरट्या घालत होते. त्यांचा चिवचिवाट वाऱ्याच्या शिळेला साथ देत होता. पक्षांच्या विविध जाती पाहायला मिळाल्या. काल आमच्या नादुरूस्त जीपला सोबत करणारे झेब्रे, हरणे आमची वाट तितक्याच उत्सुकतेने पहात होती. ते मोकळं सोनेरी रान, उडणारे पक्षी, आजूबाजूला वावरणारे प्राणी... काहीही विसरणे केवळ अशक्यप्रायच!







परत आलो तेव्हाही ओला टॉवेल व सरबताचा ग्लास तयार. या लॉजचे वैशिष्ट्य असे की, कोठेही सुवेनीर शॉप, रेस्टॉरन्ट, शॉपिंग सेंटर नाही. चहा पाणी, न्याहारी, जेवण सगळे सगळे इथेच. टीव्ही, फोनची गरज खरं तर किती कमी असते याची जाणीव झाली. पहाटेचा वेक अप कॉलही प्रत्येक खोलीच्या दारावर हाताची थाप देऊनच दिला गेला. किमान पण सर्व अत्यावश्यक सुखसोयी पुरवणारं हे लॉज एक वेगळाच अनुभव देणारं ठरलं. भीती मनात घेऊन सुरू झालेली सफर खूप आनंद व खूप सारे अनुभव घेऊन मजेत झाली० पण आपल्या अगदी दारात सहकुटुंब आलेल्या हरिणकुटूंबीयांचा पाहुणचार करायचा राहून याची मात्र मनात रुखरूख राहून गेली!!!!!!!

*(पुर्वप्रसिद्धी: 'साप्ताहिक सकाळ ५ जुलै २०१४)*

# वाइटोमो कंदरीं – न्यूझीलंड

न्यूझीलंडला जाण्याआधीच त्याच्या सृष्टीसौंदर्याबद्दल, तिथल्या रस्त्यांच्या चढ उतारांबद्दल, निरभ्र आकाशाबद्दल इतकंच काय पण तगड्या गाईंबद्दलही खूप वर्णनं ऐकली होती, वाचली होती. हल्ली स्वित्झर्लंड खूप महाग झाल्याने बऱ्याच सिनेमाचे शूटिंगही न्यूझीलंडमध्येच होते ही माहितीही आमच्या पोतडीत जमा झाली होती. त्यामुळे न्यूझीलंड पहाण्याची इच्छा प्रबळ झाली व आम्ही एका कंडक्टेड टूरचा तपास सुरू केला. आमच्या वेळेसाठी योग्य अशी ‘जेट-अबाउट‘ ची एक टूर बऱ्याच प्रयत्नाने मिळाली. यावेळी आमच्या टूरमध्ये आम्ही दोघे व आमचा मुलगा असे तीनच प्रवासी होतो. त्यामुळे कुठेही स्पेशल बस नव्हती.

टूरमध्ये वाइटोमो केव्ह्जचा समावेश आहे असे वाचले तेंव्हा खरतर थोडी नाराजीच झाली कारण अशाच प्रकारच्या चुनखडी (लाइमस्टोन) च्या गुहा ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, मलेशियात पाहिल्या होत्या. इथे आणखी वेगळं काय दिसणार ? एखादे वेगळे प्रेक्षणीय स्थळ असायला हवे होते, असे वाटले. पण इलाज नव्हता. शेवटी टूरच्या आखलेल्या कार्यक्रमानुसारच जावे लागते. पण तिथे आयुष्यभर लक्षांत राहणारा अनुभव येणार आहे याची कल्पनाच नव्हती.

ऑकलंडची प्रेक्षणीय स्थळे पाहून झाली. किती प्रचंड चढ उतार या शहरात आहेत याचे आश्चर्य करून झाले. मोटारी कशा पुढची दोन चाके फुटपाथवर चढवल्याखेरीज व्यवस्थित पार्क करता येत नाहीत याचीही नोंद घेऊन झाली. ऑकलंडच्या टॉवर वरून आजूबाजूचे विहंगम दृश्य डोळे भरून पाहिले व टॉवरच्या ऑब्झर्वेशन डेस्कच्या खूप उंचीवरच्या काचेच्या जमिनीवरून चालण्याचा विलक्षण अनुभवही घाबरत घाबरत घेतला. दोन-तीन दिवस शहरात मस्तपैकी भटकून झाल्यावर आम्ही पुढचा मुक्काम – रोटोरुआ कडे जायला निघालो.

इथल्या प्रवासाची जरा वेगळीच गंमत दिसली. आम्हाला विमानतळवरून जो गाईड कम कार ड्रायव्हर आम्हाला घेऊन हॉटेलवर आला तो परत कधीही दिसला नाही. रोज नवीनच माणूस आम्हाला ऑकलंड दाखवायला न्यायचा, तोच माहिती सांगायचा व दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम हॉटेलची रिसेप्शनीस्ट सांगायची. तसे ऑकलंड सोडायच्या वेळी नवीनच माणूस आला व आम्हाला बस स्टॅंडवर घेऊन गेला.

ऑकलंडच्या स्टॅंड वरून निघणाऱ्या प्रवासी बसने आमचा पुढचा प्रवास होता. बसची तिकीटे व रोटोरूआची हॉटेल व्हाऊचर्स आमच्या हातात देऊन, आम्हाला बसमध्ये बसवून काही विचारायच्या आत तो निघूनही गेला. बसचा ड्रायव्हरच सगळी आजुबाजूची माहिती सांगत होता. ऑकलंडपासूनचा प्रवास हायवेवरून होता. रस्त्याच्या एका बाजूला स्वच्छ नदी होती तर दुसऱ्या बाजूला मोठमोठी चराऊ कुरणे. त्यात गाई व मेंढ्या चरत होत्या. जमीन किती सुपीक होती ते त्यांच्या आकारावरूनच समजत होते. त्यांची राखण करणारे कुत्रे व तगडे घोडेही चरताना दिसत होते. माणसे मात्र अभावानेच दिसली. कधी सरळसोट तर कधी वळणे घेणारा काळाभोर रस्ता समोर दिसत होता. रस्त्याच्या दुतर्फा झाडे मात्र फारशी नव्हती. आजुबाजूचे निसर्गसौंदर्य पाहतापाहता दोन तीन तासांचा प्रवास कसा संपला कळलेच नाही आणि आम्ही वाइटोमो डिस्ट्रिक्ट मधल्या ’केव्ह’ पाशी आलो. जेवणाचा स्टॉप वायटोमो केव्हजचा होता. बस थांबताच स्थानिक गाईड पुढे आला आणि त्याने बसमधल्या प्रवाशांचा तांडा ताब्यात घेतला. सगळे त्याच्यामागोमाग निघाले.


GLOWWORM
CAVE
CAVE TICKETS
GLOWWORM CAVE
ADULTS $20-00
CHILDREN $10-00
ALL PHOTOGRAPHY
& VIDEO IN THE
CAVES IS
ARANUI CAVE
ADULTS
CHILDREN
CAVE SPECIAL
FAMILY GROUP CONCESSIONS
GLOWWORM CAVE
ADULTS
CHILD
GLOWWORM & ARANUI CAVE
MUSEUM & CAVE
MUSEUM OF CAVES

समोर वाइटोमो केव्हची दिशा दर्शविणारा एक उंच खांब- टोटेम पोल– होता. त्यावर मावरी पद्धतीचे कोरीवकाम खूपच छान होते.





समोर एक छोटीशी टेकडी अन त्यामागे आणखी काही तुरळक टेकड्या.

‘ वाइटोमो केव्हज ’ हे आता प्रवासी लोकांसाठी एक आकर्षक ठिकाण झाल्याने ह्या गुहा व त्या अनुषंगाने येणाऱ्या प्रवाशांच्या गरजा पुऱ्या करण्यासाठी झालेली आजुबाजुची वस्ती एवढाच काय तो वाइटोमो खेड्याचा पसारा दिसत होता. वीस लाख वर्षांपूर्वीपासूनच्या या ४-५ गुहांच्या आस्तित्वाची ‘मावरी ’ लोकांना कल्पना होती. परंतु अंतर्भागात शिरण्याचा रस्ता, आतील रचना वगैरे गोष्टी स्थानिक मावरी प्रमुख ‘ताने तीनोराउ ’ ह्याने इंग्लिश संशोधक ‘फ्रेड मेस’ ह्याच्या मदतीने १८८७ च्या सुमारास शोधून काढल्या, आणि आपली पत्नी ‘हुती’ व इतर कुटुंबसदस्यांच्या मदतीने प्रवासी लोकांना या गुहा अत्यल्प फी आकारून दाखवायला सुरवात केली. प्रवाश्यांची संख्या वाढत गेली तसतसे प्रशिक्षित वाटाडेही तयार होऊ लागले. १९०६ मध्ये सरकारने या गुहांची व्यवस्था आपल्या ताब्यात घेउन गुहेत दिवे, रस्ते, कठडे इत्यादी सोई केल्या आणि १९८९ च्या सुमारास त्या गुहांचा ताबा परत ताने तीनोराउ याच्या वारसांच्या ताब्यात दिला.

न्यूझीलंडचे मूळ रहिवासी मावरी. भरपूर उंच, धिप्पाड म्हणावे अशी अंगकाठी पण काटक, चपट्या नाकाचे, तांबूस वर्णाचे मावरी वृत्तीने लढवय्ये असले तरी शिक्षणाअभावी त्यांचा गोऱ्यांपुढे टिकाव लागला नाही. पण न्यूझीलंड मध्ये त्यांच्या भाषेचा ठसा कायम आहे. वाइटोमो हे नाव मावरी भाषेतलेच. 'वाइ' म्हणजे पाणी, ' टोमो' म्हणजे जमिनीतील पोकळी किंवा खाच. म्हणजे वाइटोमो ह्याचा साधा अर्थ "जमिनीखालच्या भोकातून वाहणारे पाणी". हा भूभाग लक्षावधी वर्षे समुद्रतळाशी एकावर एक साठलेल्या चुनखडी दगडांचा व त्यामधल्या प्राण्यांच्या अवशेषांचा तयार झालेला आहे. भूगर्भात सतत चाललेल्या हालचालींमुळे या चुनखडीच्या (लाईमस्टोन) टेकड्या वर आल्या. समोर दिसत होती ती टेकडी पांढरट चॉकलेटी, क्वचित ठिकाणी अंगाखांद्यावर झुडुपे, गवत वागवणारी होती. टेकडीच्या खडकांचा रंग बऱ्याच ठिकाणी काळपट लालही होता. एकूणच दृश्यात बाहेरून तरी खास आकर्षक काही नव्हते.

ग्लोवर्म केव्ह, रुआकुरी केव्ह, अरानुई केव्ह, आणि गार्डनर केव्ह यांचा समूह म्हणजे वाइटोमो केव्हज. या पैकी अरानुई केव्हच्या पोटात जाण्यासाठी आम्ही तयार झालो.





टेकडीवर चढण्याचा मार्ग पायऱ्या पायऱ्यांचा व काही ठिकाणी सपाट होता. टेकडीच्या जवळ जवळ अर्ध्या उंचीपर्यंत चढल्यावर आम्ही टेकडीमध्ये तयार केलेल्या भुयारात शिरलो. लाकडी फळ्या टाकून २-३ माणसे एका वेळी जाऊ शकतील अशी वाट केली होती. त्यावरून आम्ही भुयारात चालू लागलो. आजुबाजूला अगदी अंधुक उजेड होता. जास्त प्रखर प्रकाशाचा चुनखडीवर अनिष्ट परिणाम होतो म्हणून ही खबरदारी असे गाईडने सांगितले. आधारासाठी कडेच्या कठड्याची सोय होती म्हणून बरे. कारण अंधारात अडखळायला झाले तरीही झीज होईल म्हणून बाजूच्या चुनखडीच्या दगडांना हात लावायला परवानगी नव्हती.



मधेमधे थोड्या थोड्या अंतरावर ऑब्झरवेशन डेकसारखे मंच तयार केले होते. तिथे थोडे थोडे प्रवासी एकत्र नेले जायचे व पटकन दिवे लागायचे. समोरचे दृश्य एकदम प्रकाशमान व्हायचे. प्रत्येक वेळी समोर वेगळेच दृश्य दिसायचे. कधी नाटकाचा रंगमंच तर कधी दोन डोंगरांच्या आडून डोकावणारा सूर्य. मधूनच उडणारे पक्षी त्यात भरच घालायचे. एका ठिकाणी प्रकाशझोत अशा त-हेने अचानक फिरला की जणू नायलॉनचा एक तलम झिरझिरीत पडदाच एका बाजूने उलगडत उघडत जातोय. रंगीबेरंगी दिव्यांच्या झोताने त्यात अनेक रंग भरले आणि एक अप्रतिम दृश्य नजरेसमोर साकार झाले. पहाता पहाता संपूर्ण पडदा वरच्या बाजूला गुलाबी, मधे मधे हिरव्या, पांढऱ्या, केशरी, निळ्या रंगांनी न्हाऊन निघाला आणि सोनेरी रंगाच्या झालरीने अधिकच सुशोभित झाला.



जेमतेम दीड-दोन मिनिटांचा खेळ, पण या अगोदर बऱ्याच पायऱ्या चढण्याचे झालेले श्रम विसरायला लावणारा होता. प्रवाशांच्या प्रत्येक समूहाबरोबर असणारे गाईड त्या नयनरम्य दृश्याचे सुरस वर्णन करून त्या दृश्यात आणखी रंग भरत होते. पुनः मिणमिणत्या प्रकाशात पुढची वाटचाल सुरू झाली तरी डोळ्यासमोर मात्र पडद्याची उघडझाप चालूच होती. डोंगराच्या वरच्या बाजूने भेगांमधून खाली झिरपणाऱ्या पाण्याच्या थेंबांबरोबर चुन्याचे कण वाहून येतात. गुहांच्या छपरापासून हे थेंब ठिबकतात व असे चित्रविचित्र व नयनमनोहर आकार – स्टॅलॅक्टाइट व स्टॅलॅग्माइट – छपरापासून निघतात आणि तळाशी तयार होतात. पुढे अशी बरीच गंमत जंमत करणारी दृश्ये दिसली.



कुठे खांब छतापाशी लटकतोय तर कुठे अर्धवट लोंबकळणारी भिंत तर कुठे रंगमंच. त्यातच गाईडने “समोर जो उंच सुळका दिसतोय ना त्यावर चढून विवाहबद्ध होण्यासाठी प्रेमी युगुलेही कधी कधी येतात” असे सांगितले व नवीनच दृश्य डोळ्यासमोर उभे केले. कडक सुटाबुटातला प्रियकर व पांढऱ्या पायघोळ वधुवेशात नटलेली प्रेमिका एकमेकांना आधार देत हातात हात घालून त्या अरूंद उंच सुळक्य़वर उभे आहेत व टाळयांच्या गजरात एकमेकांना आयुष्यभर साथ देण्याचे वचन देताहेत... नजरेसमोर मस्त दृश्य साकार होत होते. धन्य त्या प्रेमिकांची! पण प्रश्न एवढाच पडला की पाद्रीबाबा आणि वऱ्हाडी कुठे उभे राहिले असतील?




चुनखडीपासून तयार झालेली शिल्पे पहात पहात आम्ही पुढे सरकत होतो. प्रत्येक दृश्याचे काही वेगळेच रंगरूप होते. प्रत्येक ठिकाणी काहीतरी नवीन बघण्यासारखे असतेच असते याचा पुनःप्रत्यय आला. डोंगराच्या पोटात किती पायऱ्यांची चढउतार झाली असेल त्याची आमचे थकलेले पाय अधूनमधून जाणीव करून देत होते. पोटातले कावळेही आता भुकेची आठवण करून देत होते. दोन तास कसे संपले कळले देखील नाही. आम्हाला बाहेर यायचे नव्हते तरी पायाखालची वाट हळूहळू प्रकाशमान व्हायला लागली व आम्ही डोंगराच्या पोटातून बाहेर आलो. नाही म्हटले तरी चुनखडीच्या कोंदट वासातून मोकळ्या हवेत आल्यावर खूप बरे वाटले. सगळ्यांची पावले आपोआपच पोटपूजेकडे वळली. तिथे असाणारे छोटेसे उपहारगृह व सुव्हीनीयर विकणारे एक लहानसे दुकान आमची वाट पहात होते. त्याला यथाशक्ती आश्रय देऊन आमचा मोर्चा ‘ग्लोवर्म केव्ह्ज’ कडे वळला.

त्यासाठी आम्हाला डोंगराला थोडा वळसा घालून बऱ्याच पायऱ्या उतरून खाली जावे लागले. खाली जाईपर्यंत कल्पना नव्हती की, पुढचा प्रवास छोट्याशा नदीतून होता. पायऱ्या जिथे संपल्या तिथे रूंद प्लॅटफॉर्म होता. त्याच्या धक्क्याला छोटीशी बोट आमची वाट पहात होती. नदीच्या पाण्यात डोंगरावरची चुनखडीची वेगवेगळी लोंबणारी झालर आपले प्रतिबींब पहात होती. आम्ही बोटीत बसताच चालकाने ती बांबूच्या सहाय्याने डोंगराच्या पोकळीत ढकलली.



दहा-बारा माणसे बसू शकतील अशी एक छोटी होडी जेमतेम जाऊ शकेल एवढीच रुंद नदी डोंगराच्या अंतर्भागातून वहात होती. तिचा उगम व शेवट कुठे होता कोण जाणे. असा नदीचा प्रवाह मी पहिल्यांदाच पाहिला. काळेशार पाणी व दोन्ही बाजूंना डोंगराच्या पोटातला बोगदा. त्यावर सतत पाणी झिरपत होते. हवा थंडगार होती. पाण्याचा व होड्यांचा चुबुक डुबुक असा आवाज येत होता. आम्ही होडीत बसताच प्रवाहाबरोबर होडी अलगद पुढेपुढे जाऊ लागली. गाईड गप्प होता. आम्हालाही बोलणे सुचत नव्हते. फक्त नावाडीच काय ते एकमेकांशी संपर्क साधण्यापुरते बोलत होते. मी तर ’हा नावाडी आता वल्हे कसे मारणार?’ या विचारात होते, कारण हात लांब केला तर भिंत लागेल एवढीच बोगद्याची रुंदी होती. लांबवरचं फार काही दिसत नव्हतं.





जेव्हा पायऱ्या उतरून खाली आलो होतो, तेव्हा लख्ख नाही पण सगळीकडचं साधारण दिसू शकेल इतपत उजेड होता. होडीत बसलो तेव्हाही आजूबाजूचे झिरपणारे पाणी, समोरचा प्रवाह, थोड्या अंतरावर एकादी होडी दिसत होती. पण होडी चालू झाली अन सगळं बरंच अंधुक झालं. तरीही भिंती नावाडी वगैरे दिसत होते. ' वल्ही कशी मारणार?' याचे उत्तर लगेच मिळाले. नावाडी उभा राहिला आणि त्याने वर लावलेला आडवा दोर धरून त्याच्या आधाराने होडी पुढे न्यायला सुरुवात केली. " पाण्यात हात घालू नका, वाकू नका, अनावश्यक आवाज करू नका.. " वगैरे आवश्यक सूचना देऊन तोही गप्प झाला. होडीखेरीज दुसरा आवाज नव्हता. आम्ही कुठून कुठे जात होतो काहीही कळत नव्हतं. ५-१० मिनीटे पाण्यातून पुढे गेल्यावर अचानक धबधब्याचा ध्वनि ऐकू आला.

डोंगराच्या आतच साधारण २५ फूट उंचीवरून पाणी खाली पडत होते. अगदी एका रेषेत पडणारे पाणी आपल्य़ा आवाजाने आजूबाजूची शांतता भंग न करण्याची पूर्ण काळजी घेत होते. या ठिकाणी एक-दोन पांढरे व एक दोन रंगीत दिवे होते. त्यांचा उजेड पाण्यावर पडून वेगवेगळया रंगछटा निर्माण होत होत्या. खाली पडणाऱ्या पाण्याचे तुषार इंद्रधनुष्याचे रंग घेऊन चमकत होते, क्वचित आम्हालाही भिजवत होते. खूपच छान दृश्य होते ते. त्याचे फोटो काढून आम्ही पुढे सरकलो. पुन्हा दिव्यांच्या उजेडाची सोबत संपली व होड्या अंधाराच्या पोटात घुसल्या. नदीच्या पात्रातील एका घुमटा सारख्या मोठ्या गोलाकार जागेत आमची होडी थांबली. आता मात्र मिट्ट काळोख होता. पण डोळे अंधाराला सरावल्यानंतर इकडे तिकडे थोडेफार दिसू लागले. पाण्यावर छोटे छोटे प्रकाशाचे ठिपके नाचत होते. जणूकाही पाण्याच्या पृष्ठभागावर छोट्या छोट्या दिव्यांची रांगोळी काढल्यासारखे दिसत होते.



आम्ही पाण्यातले दृश्य पहाण्यात गर्क होतो तोच एकदम गाईडचा आवाज आला -- “वर बघा”. सगळ्यांच्या माना एकदम वर गेल्या. काय चमत्कार... आकाश आणि चमचमणाऱ्या चांदण्या!!!!!!!!!!



बोलायचे नव्हते तरी हलक्या आवाजात “वाव” असा चित्कार तोंडून निघालाच. जणू संपूर्ण डोंगरमाथा कापून काढला होता आणि आपण बाहेर मोकळ्यावर आलो आहोत असे वाटू लागले. काळेभोर निरभ्र आकाश व चमचमणाऱ्या असंख्य चांदण्याच चांदण्या. पण चांदोबाचा पत्ता नव्हता.

सहजच आम्ही तिघे नक्षत्रे ओळखायच्या प्रयत्नाला लागलो... अश्विनी, भरणी, मृग, सप्तर्षी – एक ना दोन. आणि मग लक्षात आले की या तारका नसून हे Arachnocampa Luminosa या जातीचे, डासाच्या आकाराएवढे, बहुतांश करून न्यूझीलंड मध्येच आढळणारे काजवे आहेत. गुहेच्या छतावर मुक्काम ठोकून लुकलुकत आपला प्रकाश टाकत होते. आकाराने व आयुष्यमानानेही इतका छोटा असणारा हा कीटक आपली अद्भुत, थक्क करणारी किमया दाखवीत होता. निळसर, पांढरे, हिरवट, असे असंख्य छोटे मोठे लुकालुकणारे प्रकाशाचे बिंदू छतावरून इकडून तिकडे हलत होते. त्याच्या लुकलुकण्यामुळे अगदी चांदण्यांचा भास होत होता. आम्ही ते अद्भुत दृश्य डोळ्यात साठवून ठेवत होतो. एखाद्या गर्भरेशमी चंद्रकळेसारखे काळेभोर छत चमचमत्या खडीने शोभिवंत दिसत होते.

*’चमचम तारापुंज भूषणे शोभिवंत वसनी,*
*ज्योत्स्नेचे मृदु वस्त्र रेशमी ल्याली ती रजनी ’*

कालिदासाच्या काव्याची आठवण झाली नसती तरच नवल!



अनेक प्रवाशांची मात्र घोर निराशा झाली असणार, कारण फ्लॅश फोटोग्राफी मना होती. अनिमिष नेत्रांनी पापणीही न लववता आम्ही ते दृश्य पहात होतो तेवढ्या वेळात नावाड्याने होड्या अशा चलाखीने वळवल्या की, एकाद्या प्लॅनेटेरियममध्ये बसल्यासारखे वरचे आकाश संपूर्ण तारकासमूहासह आमच्या भोवती फिरले. होड्या पुढेमागे करून, एकमेकांना वाट करून देत नावाडी चलाखीने परतपरत त्या आकाशमंडलाखाली आम्हाला आणून हा अनोखा अनुभव देत होते. हे दृश्य पहाता पहाता नावाड्यांनी होड्या कधी बाहेरच्या दिशेने वळवल्या कळलेसुद्धा नाही.

परतीच्या प्रवासात सुद्धा काजव्यांचे भिंतींच्या कपारींवर झालेले गुच्छ, छतावरून लोंबकाळणाऱ्या माळा आमचे लक्ष वेधून घेत होत्या. मधूनमधून आजूबाजूच्या भितींवर व छतावर चुकार काजवे आपला कळप सोडून हिंडताना दिसत होते. जणू काही आम्हाला ‘‘लौकर परत या बरका, आम्ही वाट पहातोय‘‘ असा निरोप द्यायलाच ते आले होते. हा निरोपसमारंभ चालू असतानाच हळू हळू प्रकाश वाढू लागला व आम्ही पायऱ्यांपाशी परत आलो. वीस-पंचवीस मिनिटांची ही काजव्यांची सफर एक विलक्षण अनुभव देऊन गेली. आज इतकी वर्षे झाली तरीही ’ग्लो वर्म’ केव्हज मधल्या त्या काजव्यांच्या दुनियेची किमया स्मृतीतून कणभरही पुसली गेली नाही. अगदी छोटेसे आयुष्य असणारा, अंधाराशिवाय इतरवेळी लक्षातही न येणारा जीव दुसऱ्याला किती मोठा आनंद देतो हे अनुभवल्यावर आपण त्या काजव्यांना ‘‘धन्य ही जीवनकळा... ’’ एवढेच म्हणू शकतो.

(पूर्वप्रसिद्धी: ‘साप्ताहिक सकाळ दि. १७ मे २०१४)

## दुर्ग दुर्घट भारी

*आसेतूहिमाचल*

## सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण…

कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल

वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या "मी पाहिलेला…" सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा आणि वळणांचा आनंद वाटताना तुमच्या आनंदात वाटेकरी मिळाल्याचाही आनंदच वाटेल.

आपल्या लेखनाची मेल व फोटो पाठवा.

esahity@gmail.com